# प्रकरण ४ थे.

## माहितीचे पथक्करण व अर्थनिर्वचन

४. १ प्रस्तावना.

४. २ प्रश्नावलीच्या साहाय्याने मिळविलेल्या माहितीचे पृथक्करण व अर्थनिर्वचन.

अ] प्रतिसादकांची सामान्य माहिती.

ब] बापूजी साळुंखे यांचे व्यक्तीगत जीवन व शिक्षणविषयक दृष्टिकोन.

क] बापूजी साळुंखे यांचे शिक्षण प्रसार कार्य.

ड] बापूजी साळुंखे यांचे स्त्री शिक्षणाबाबतचे कार्य.

इ] बापूजीचे वसतिगृहा संबंधीचे कार्य.

ई] बापूजीचे समाज परिवर्तन व जातीभेद निर्मूलनासंबंधी कार्य.

४. ३ मुलाखतीच्या साहाय्याने मिळविलेल्या माहितीचे पृथक्करण व अर्थनिर्वचन.

अ] बापूजी साळुंखे यांचे व्यक्तीगत जीवन.

ब] बापूजीसाळुंखे यांचे शिक्षण प्रसार कार्य.

क] बापूजी साळुंखे यांचा स्त्री शिक्षणविषयक दृष्टिकोन व कार्य.

ड] बापूजीचे साळुंखे यांचे सामाजिक एकता व जातीभेद निर्मूलनाबाबतचे कार्य.

इ] विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले कार्य.

ई] शिक्षण संस्थेचे ध्येय.

४. ४ शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांनी सुरु केलेल्या विविध शाखांना भेटी देवून मिळविलेल्या माहितीचे अर्थनिर्वचन.

अ] बापूजी साळुंखे यांनी स्थापन केलेली कांही माध्यमिक ~~व~~ उच्च माध्यमिक विद्यालये.

ब] बापूजी साळुंखे यांनी स्थापन केलेली कांही तंत्र विद्यालये.

क] बापूजी साळुंखे यांनी स्थापन केलेली कांही महाविद्यालये.

ड] बापूजी साळुंखे यांनी स्थापन केलेली कांही अध्यापक विद्यालये व अध्यापक महाविद्यालये.

४. ५ समारोप.

# प्रकरण - ४ थे

## माहितीचे पृथःकरण व अर्थनिर्वचन

### ४.१ प्रस्तावना -

प्रकरण तीन मध्ये महाराष्ट्रातील विसाव्या शतकातील सामाजिक व शैक्षणिक पार्श्वभूमीचा आढावा घेतला आहे. " शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांनी महाराष्ट्र राज्यामध्ये शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कार्याचा चिकित्सक अभ्यास करणे" हा अभ्यासकाचा विषय आहे. या विषयासंबंधी अभ्यासकाने माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावली, मुलाखती, बापूजींच्या जीवन कार्यासंबंधीचे प्रकाशित साहित्य, बापूजींनी स्थापन केलेल्या विविध शाखांना भेटी या साधनांचा उपयोग करून माहिती मिळविली, तिचे पृथःकरण करून अर्थनिर्वचन या प्रकरणात केले आहे.

### ४.२ प्रश्नावलीच्या साहाय्याने मिळविलेल्या माहितीचे पृथःकरण व अर्थनिर्वचन-

अभ्यासकाने संशोधनाची उद्दिष्टे लक्षात घेवून प्रश्नावली तयार केली. [ प्रश्नावली परिशिष्ट २ मध्ये दिली आहे. ] शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संबंधात आलेल्या ८० व्यक्तींना अभ्यासकाने प्रश्नावल्या दिल्या. परगांवी असणा-या कांही व्यक्तींना प्रश्नावली पोष्टाने पाठवल्या. उस्मानाबाद, तुळजापूर, सातारा, कराड, तासगांव, इचलकरंजी येथे जावून तेथील संस्थेच्या आजीव सदस्यांना, शिक्षकांना अभ्यासकाने प्रत्यक्ष भेटून प्रश्नावल्या दिल्या. ९ जून १९८८ रोजी " श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या [ ताराबाई पार्क] कोल्हापूर येथील कार्यालयात डॉ. बापूजींच्या ७० व्या जयंतीदिवशी अभ्यासकाने प्रत्यक्ष हजर राहून संस्थेच्या कांही सभासदाकडून प्रश्नावल्या भरून घेतल्या. कांहींना स्मरणपत्रे पाठवून प्रश्नावल्या भरून परत मिळविल्या. प्रश्नावली भरून देणा-या प्रतिसादकांची यादी परिशिष्ट चार मध्ये दिली आहे.

प्रश्नावलीचे सोयीसाठी अ, ब, क, ड, ई. ई असे विभाग केले होते.
प्रश्नावलीच्या "अ" विभागामध्ये प्रतिसादकांची सामान्य माहिती विचारली होती.

४.२ अ] प्रतिसादकांची सामान्य माहिती -

या विभागातील पहिला प्रश्न प्रतिसादकांच्या नावाविषयी विचारला होता. प्रतिसादकांच्या नावांची यादी परिशिष्ट तीनमध्ये दिली आहे. प्रतिसादकाकडून माहिती मिळविताना प्रतिसादक जर जास्त शिक्षण घेतलेले असतील तर त्यांच्याकडून मिळणारी माहिती ही अधिक महत्वाची असू शकते म्हणून
या विभागातील दुसरा प्रश्न प्रतिसादकांच्या शैक्षणिक पात्रतेसंबंधी होता. विचारला होता. त्या माहितीचे वर्गीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

शैक्षणिक पात्रतेनुसार प्रतिसादकांचे वर्गीकरण

कोष्टक क्रमांक-४.१.

| अ.नं. | शैक्षणिक पात्रता | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रतिसादक |
|---|---|---|---|
| १. | एम्.एस्.सी. | ५ | १० |
| २. | पदवीधर | ४३ | ८६ |
| ३. | पी.एच्.डी. | २ | ४ |
| | एकूण | ५० | १०० |

मिळालेल्या प्रश्नावलीतील प्रतिसादकामध्ये पदवीधरांचे शेकडा प्रमाण ८६ होते.
एम्.एस्.सी. शिक्षण झालेल्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण १० होते.
डॉक्टरेट असलेल्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ४ होते.

यावरून जास्तीत जास्त प्रतिसादक पदवीधर म्हणजे चांगल्या शैक्षणिक पात्रतेचे होते. त्यामुळे त्यांच्याकडून मिळालेली माहिती जास्त महत्वाची व विश्वसनीय असल्याचे दिसून येते.

या विभागातील तिसरा प्रश्न प्रतिसादक संस्थेचा माजी विद्यार्थी आहे का हे जाणून घेण्यासाठी होता.

या प्रश्नाच्या उत्तरावरून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले आहे.

संस्थेचे माजी विद्यार्थी असलेल्या प्रतिसादकांचे वर्गीकरण.

पन्नास प्रतिसादकापैकी ३६ प्रतिसादक [शेकडा ७२] संस्थेचे माजी विद्यार्थी होते.

यावरून बहुसंख्य प्रतिसादक संस्थेचे माजी विद्यार्थी असल्याने त्याना बापूजींच्या शैक्षणिक कार्याविषयी जवळून माहिती असल्याचे दिसून येते.

या विभागातील चवथा प्रश्न प्रतिसादक संस्थेत कोणत्या पदावर सेवा करीत आहे या संबंधी होता. त्या माहितीचे वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

संस्थेतील पदानुसार प्रतिसादकांचे वर्गीकरण

कोष्टक क्रमांक ४.२.

| अ.नं. | संस्थेतील पद | प्रतिसादकांची संख्या | शेकडा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| १] | कारकून | ६ | १२ |
| २] | शिक्षक | ११ | २२ |
| ३] | मुख्याध्यापक | ५ | १० |
| ४] | प्राध्यापक | २० | ४० |
| ५] | प्राचार्य | ८ | १६ |
| | एकूण | ५० | १०० |

मिळालेल्या प्रश्नावलीतील प्रतिसादकामध्ये पदानुसार प्राध्यापकाचे शेकडा प्रमाण ४० आहे. शिक्षकाचे शेकडा प्रमाण २२ आहे. प्राचार्य यांचे शेकडा प्रमाण १६ आहे. कारकूनाचे शेकडा प्रमाण १२ आहे. मुख्याध्यापकाचे शेकडा प्रमाण १० आहे.

यावरून प्रतिसादकामध्ये प्राध्यापक जास्त होते. त्यांनी बापूजींच्या कार्याचा अभ्यास केलेला आहे. त्यांच्याकडून मिळालेली माहिती महत्वाची आहे. तसेच कारकून शिक्षक, मुख्याध्यापक, प्राचार्य या संस्थेतील सेवकांच्या सर्व थरातून प्रतिसादक असल्याने त्यांची वेगवेगळी मते बापूजींच्या कार्याची माहिती देण्यासाठी महत्वाची असल्याचे दिसून येते.

या विभागातील पाचवा प्रश्न प्रतिसादकांचा व बापूजींचा संबंध किती साली कोणत्या प्रसंगी आला या संबंधी होता.

प्रतिसादकांनी दिलेल्या माहितीवरून खालील बाबी दिसून येतात. कांही प्रतिसादकांनी अपूर्ण उत्तरे दिली आहेत.

पंधरा प्रतिसादकांनी उत्तरे दिली नाहीत. [त्याचे शेकडा प्रमाण ३० आहे.]
पंधरा प्रतिसादकांनी संस्कार शिबीराच्या वेळी संबंध आला असे म्हटले आहे. [ त्याचे शेकडा प्रमाण ३० आहे. ]

दहा प्रतिसादकांनी नोकरीत मुलाखतीच्या वेळी मुलाखत घेताना संबंध आला असे म्हटले आहे. [त्याचे शेकडा,पमाण २० आहे. ] सहा प्रतिसादकांनी बापूजीनी उपोषणे केली त्यावेळी संबंध आला असे म्हटले आहे. [ त्याचे शेकडा प्रमाण १२ आहे]. चार प्रतिसादकांनी वसतिगृहातील श्रमदान करीत असतांना संबंध आला असा उल्लेख केला आहे. [ त्याचे शेकडा,पमाण ८ आहे. ]

यावरून प्रतिसादकांचा बापूजीशी प्रत्यक्ष संबंध मुलाखतीच्यावेळी संस्कार शिबीराचे वेळी, उपोषणाचेवेळी, श्रमदानाचे वेळी अशा निरनिराळ्या प्रसंगी आल्याचे दिसून येते. प्रत्यक्ष संबंध तसा कमीच आला तरी बहुसंख्य प्रतिसादक संस्थेचे कर्मचारी असल्याने त्यांचा बापूजीशी संबंध अधिक वेळा येत असल्यामुळे त्यांनी दिलेली माहिती अधिक विश्वसनीय व महत्वाची आहे.

४.२ ब] **बापूजींचे व्यक्तीगत जीवन व शिक्षणाविषयक दृष्टिकोन.**

१] बापूजींची गुणवैशिष्ठ्ये -

या विभागातील पहिला प्रश्न बापूजींच्या जीवनातील आठवणी संबंधी होता. त्या माहितीचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे.

प्रतिसादकांनी दिलेल्या माहितीवरुन खालील बाबी दिसून येतात.

या प्रश्नाची २२ प्रतिसादकानी उत्तरे दिली नाहीत [ त्याचे शेकडा प्रमाण ४४ आहे. ] उत्तरे दिलेल्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ५६ असून त्यानी खालील आठवणी सांगितल्या.

[क] छत्रपती शाहू महाराज हायस्कूल, कोल्हापूर - येथील हायस्कूलच्या इमारतीचे बांधकाम चालू असताना इमारतीच्या खोल पायात बापूजी पडले. ते रक्तबंबाळ झाले होते. त्यामुळे त्याना तीन महिने छत्रपती प्रमिलाराजे हॉस्पीटलमध्ये ठेवले होते. अशा जीवावर बेतलेल्या अवस्थेत सुध्दा संस्थेच्या कारभाराकडे बापूजी लक्ष्य देत असत. असा १० प्रतिसादकांनी [ शेकडा २० ] उल्लेख केला.

[ख] पाटण तालुक्यातील माजगांव येथे रात्री १० वाजता कांही अज्ञात व्यक्तींनी बापूजींच्यावर प्राणघातक हल्ला केला याबाबत ६ प्रतिसादकांनी [ शेकडा १२ ] उल्लेख केला.

[ग] पुणे विद्यापीठापुढे बापूजी कॉलेज मान्यतेसाठी उपोषणास बसले होते. ही आठवण ६ प्रतिसादकांनी [ शेकडा १२] व्यक्त केली आहे.

[घ] सर्व शिक्षक वर्गाला संस्कार शिबीरात एकत्र आणून त्यांना वेगवेगळ्या प्रश्नावर चर्चा करावयास ते लावीत व निरनिराळ्या शाखाना अचानक भेटी देत याबाबत ४ प्रतिसादकांनी [शेकडा ८] उल्लेख केला.

[च] अमेरीकेतील कॅनडा राज्यात शिक्षक प्रशिक्षण शिबीरासाठी प्राध्यापक श्री. चिंचोळकर व प्राध्यापक श्री.पाडे यांची निवड केली.

ह्या आठवणीचा २ प्रतिसादकांनी [शेकडा ४] उल्लेख केला.

यावरुन बापूजींनी शिक्षण प्रसार कार्य करीत असतांना अतिशय कठीण

प्रसंगाला त्यांनी धैर्याने तोंड दिले आणि संस्थेच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न केल्याचे दिसून येते. संस्थेच्या कामकाजात त्यांचे सदोदित लक्ष असे. शिक्षक वर्गासाठी संस्कार शिबीरे आयोजित करून त्याना मार्गदर्शन करणे, तसेच शिक्षकांना योग्य संधी देणे असा शिक्षकाबाबतचा त्यांचा दृष्टीकोन दिसून येतो. प्राणघातक हल्ले त्यांच्यावर झाले असतांना तसेच अपघात झाला असतांना सुध्दा जीवाची तमा न बाळगता संस्थेसाठी संपूर्ण आयुष्य त्यांनी घालविले असे प्रतिसादकांनी दिलेल्या निरनिराळ्या आठवणी वरून दिसून येते. वरील आठवणीच्या मुद्दावरून बापूजींची काम करण्याची चिकाटी, अहोरात्र संस्थेसाठी कष्ट करण्याची तयारी, त्यागी वृत्ती, कठीण परिस्थितीला तोंड देण्याची वृत्ती इत्यादी गुण दिसून येतात.

२] <u>बापूजींचा स्वातंत्र्य चळवळीत सहभाग व लेखन-</u>

क] या विभागात दुसरा प्रश्न बापूजी भूमिगत चळवळीत सामील का झाले हे जाणून घेण्यासाठी होता. प्रतिसादकांच्या आलेल्या उत्तरातून खालील मुद्दे सांगता येतील. अठरा प्रतिसादकांनी [शेकडा ३६] सामाजिक कार्याची आवड असल्यामुळे बापूजी भूमिगत चळवळीत सामील झाले असे म्हटले. स्वदेशाभिमान व स्वातंत्र्य मिळविण्याविषयीची तळमळ यामुळे बापूजी भूमिगत चळवळीत सामील झाले असे १५ प्रतिसादकांनी [शेकडा ३०] म्हटले. महात्मा गांधीजीकडून मिळालेल्या प्रेरणेमुळे बापूजी भूमिगत चळवळीत सामील झाले असे ११ प्रतिसादकांनी [शेकडा २२] म्हटले. क्रांतीसिंह नाना पाटील यांना साथ देण्यासाठी बापूजी भूमिगत चळवळीत सामील झाले असे ६ प्रतिसादकांनी [शेकडा १२] म्हटले.

यावरून बापूजींना सामाजिक कार्याची आवड होती. त्यामुळे ते स्वातंत्र्य चळवळीत सामील झाल्याचे दिसून येते. तसेच स्वदेशाभिमान व स्वातंत्र्याविषयीची त्यांना तळमळ होती महात्मा गांधी व क्रांतीसिंह नाना पाटील यांच्याकडून त्यांना प्रेरणा मिळाली.

ख] बापूजीचे क्रांतीकारी लेखन -

या विभागात तीसरा प्रश्न बापूजींनी कोणते ग्रंथ लिहीले. असा विचारला होता. प्रतिसादकाच्या आलेल्या उत्तरातून खालील मुद्दे दिसून येतात.

'सातारा जिल्याचा क्रांती इतिहास' हा ग्रंथ लिहला. असा २८ प्रतिसादकांनी [ शेकडा २४ ] उल्लेख केला.

द हा प्रतिसादकांनी [शेकडा २०] उत्तरे दिली नाहीत.

यावरून क्रांतीकारकांचा इतिहास लिहण्यामागे तत्कालीन क्रांतीकारकांना प्रेरणा मिळावी व समाजामध्ये स्वातंत्र्य मिळविण्याविषयीची तीव्र भावना निर्माण व्हावी. असा बापूजींचा उद्देश होता. तसेच माध्यमिक विद्यार्थ्यांना चांगली पाठीपुस्तके मिळावीत या उद्देशाने त्यांनी पाठ्यपुस्तक लेखनाचे काम केल्याचे दिसून येते.

३] बापूजीचे व्यक्तीगत जीवन -

या विभागात तीसरा प्रश्न बापूजीचे व्यक्तीगत जीवन कसे होते हे जाणून घेण्यासंबंधी विचारला होता. त्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे ओहे.

बापूजींची राहाणी व व्यक्तीगत जीवन -

कोष्टक क्रमांक-४. ३.

| अ. नं. | राहाणी व जीवन | प्रतिसाद | शेकडा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| १] | भपकेबाज राहाणी | ० | ० |
| २] | नि:स्वार्थी जीवन | १८ | ३० |
| ३] | सेवाभावी जीवन | २४ | ४० |
| ४] | साधे जीवन | १८ | ३० |
| | एकूण | ६० | १०० |

[टिप - कांही प्रतिसादकांनी एकापेक्षा आधिक वर्णाक्षरासमोर खुणा केल्या आहेत त्यामुळे एकूण संख्या जास्त येते]

बापूजींची भपकेबाज राहाणी या उत्तरास शेकडा ० प्रतिसाद आहे.
बापूजींचे जीवन सेवाभावी होते. असे २४ प्रतिसादकाचे म्हणणे आहे.
या उत्तरास शेकडा ३० प्रतिसाद मिळाला.
बापूजीचे जीवन नि:स्वार्थी होते. असे १८ प्रतिसादकांचे म्हणणे आहे.
या उत्तरास शेकडा ३० प्रतिसाद मिळाला.
बापूजीचे जीवन साधे होते असे १८ प्रतिसादकांचे म्हणणे आहे.
या उत्तरास शेकडा ३० प्रतिसाद मिळाला.

यावरून बापूजीचे जीवन सेवाभावी नि:स्वार्थी व साधे होते असे दिसून येते.

४] बापूजींच्या जीवनावर थोर व्यक्तींच्या तत्वज्ञानाचा झालेला परिणाम.

बापूजींच्या जीवनावर कोणत्या व्यक्तींच्या तत्वज्ञानाचा परिणाम झाला होता याचा शोध घेण्यासाठी ४ था प्रश्न विचारला होता त्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे

निरनिराळ्या व्यक्तींच्या तत्वज्ञानाचा बापूजीवर झालेल्या परिणामाचे वर्गीकरण.

कोष्टक क्रमांक- ४.४.

| अ. नं. | व्यक्ती | महत्वांशानुसार क्रमांक | | | | एकूण | शेकडा प्रतिसाद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १] | भाऊराव पाटील | ०० | १० | २१ | १९ | ५० | १८.२० |
| २] | महात्मा गांधी | १० | २५ | ११ | ४ | ५० | २८.२० |
| ३] | जोतीबा फुले | ०० | १० | १५ | २५ | ५० | १७.०० |
| ४] | स्वामी विवेकानंद | ४० | ५ | ३ | २ | ५० | ३६.६० |
| | | ५० | ५० | ५० | ५० | २०० | १००=०० |

महत्वांशानुसार अनुक्रमांक द्यावयास लावल्यामुळे प्रत्येक पर्यायांचा प्रतिसाद काढतांना आकडेमोड करावी लागेल. १ ते ४ क्रमांक असल्यामुळे खालीलप्रमाणे गुण दिले.

प्रथम निवड - ४ गुण
द्वितीय निवड- ३ गुण
तृतीय निवड - २ गुण
चौथी निवड - १ गुण

एकूण प्रतिसाद संख्या ५० असल्याने एकूण गुण खालीलप्रमाणे काढले.

एकूण गुण = ५०×४+५०×३+५०×२+५०×१

= ५०× [४-३-२-१]

= ५०× [१०]

एकूण गुण = ५००

भाऊराव पाटील या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण.

एकूण गुण = ०×४ + १०×३ + २१×२ + १९×१

= ० + ३० + ४२ + १९

एकूण गुण = ९१

शेकडा गुण = $\frac{९१}{५००} \times \frac{१००}{१} = \frac{९१}{५}$ = १८.२०

महात्मा गांधी या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण.

एकूण गुण = १०×४ + २५×३ + ११×२ + ४×१

= ४० + ७५ + २२ - ४

एकूण गुण = १४१

शेकडा गुण = $\frac{१४१}{५००} \times \frac{१००}{१} = \frac{१४१}{५}$ = २८.२०

महात्मा जोतिबा फुले या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण.

एकूण गुण = ०×४ + १०×३ + १५×२ + २५×१

= ० + ३० + ३० + २५

एकूण गुण = ८५

शेकडा गुण = $\frac{८५}{५००} \times \frac{१००}{१} = \frac{८५}{५}$ = १७

स्वामी विवेकानंद या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण.

एकूण गुण = ४०×४ + ५×३ + ३×२ + २×१

= १६० + १५ + ६ + २

एकूण गुण = <u>१८३</u>

शेकडा गुण = $\frac{१८३}{५००} \times \frac{१००}{१} = \frac{१८३}{५}$ = ३६.६०

बापूजींच्या जीवनावर स्वामी विवेकानंदाचा प्रभाव पडला असे जास्त प्रतिसादकांनी म्हटले आहे. [ शेकडा प्रमाण ३६.६ ]
त्याखोलोखाल महात्मा गांधीजींच्या विचारांचा बापूजीवर प्रभाव पडला असे म्हणणा-या प्रतिसादकांचे [ शेकडा २८.२० ] प्रमाण होते.
भाऊराव पाटील यांचा बापूजीवर प्रभाव पडला असे [ शेकडा १८.२ ] प्रतिसादकांचे म्हणणे होते.
महात्मा जोतीबा फुले यांच्या विचारांचा बापूजीवर प्रभाव पडला असे [शेकडा १७] प्रतिसादकांनी सांगितले.

यावरुन बापूजींच्या जीवनावर स्वामी विवेकानंदाच्या तत्वज्ञानाचा सर्वात जास्त प्रभाव पडला होता. तसेच महात्मा गांधी, भाऊराव पाटील, महात्मा फुले यांच्या कार्याचा व विचारांचा बापूजींच्यावर प्रभाव पडला होता असे दिसून येते.

५] बापूजींचा शिक्षणविषयक दृष्टीकोण -

बापूजींचा शिक्षणविषयक दृष्टीकोण जाणून घेण्यासाठी ५ वा प्रश्न विचारला होता. त्यावरुन मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण खालीलप्रमाणे केले आहे.

बापूजींच्या शिक्षणविषयक दृष्टीकोणाचे वर्गीकरण.

कोष्टक क्र. ४.५.

| अ.नं. | बापूजींचा शिक्षणविषयक दृष्टीकोण | महत्वांशानुसार क्रमांक १ | २ | ३ | ४ | एकूण | शेकडा प्रतिसाद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १] | शिक्षणातून स्वावलंबी व्हावे | ० | ३८ | १२ | ० | ५० | २७.६० |
| २] | शिक्षण श्रमातून व्हावे | २३ | ० | २० | ७ | ५० | २७.८० |
| ३] | शिक्षण हे केवळ पुस्तकी असू नये | ० | १२ | ० | ३८ | ५० | १४.८० |
| ४] | शिक्षणातून आदर्श नागरीक व्हावेत. | २७ | ० | १८ | ५ | ५० | २९.८० |
| | एकूण | ५० | ५० | ५० | ५० | २०० | १००.०० |

महत्वांशानुसार अनुक्रमांक धावयास सांगितल्यामुळे प्रत्येक पर्यायाचा प्रतिसाद काढताना १ ते ४ क्रमांकांना खालीलप्रमाणे गुण दिले.

प्रथम निवड - ४ गुण.

द्वितीय निवड - ३ गुण

तृतीय निवड - २ गुण

चौथी निवड - १ गुण

मागील उदाहरणाप्रमाणे एकूण गुण ५०० होतात.

१] शिक्षणाने स्वावलंबी व्हावे या उत्तराचे

एकूण गुण = ०×४ + ३८×३ + १२×२ + ०×१
= ० + ११४ + २४ + ०

एकूण गुण = १३८

शेकडा गुण = १३८/५०० × १००/१ = १३८/५ = २७.६०

२] शिक्षण श्रमातून व्हावे या उत्तराचे.

एकूण गुण = २३×४ + ०×३ + २०×२ + ७×१
= ९२ + ० + ४० + ७

एकूण गुण = १३९

शेकडा गुण = १३९/५०० × १००/१ = १३९/५ = २७.८०

३] शिक्षण हे केवळ पुस्तकी असू नये या उत्तराचे

एकूण गुण = ०×४ + १२×३ + ०×२ + ३८×१
= ० + ३६ + ० + ३८

एकूणगुण = ७४

शेकडा गुण = ७४/५०० × १००/१ = ७४/५ = १४.८०

४] शिक्षणातून आदर्श नागरीक व्हावेत या उत्तराचे

एकूण गुण = २७×४ + ०×३ + १८×२ + ५×१
१०८ + ० + ३६ + ५

एकूण गुण = १४९

शेकडा गुण = १४९/५०० × १००/१ = १४९/५ = २९.८०

१] शिक्षणातून आदर्श व सुसंस्कृत नागरीक व्हावेत या उत्तराला शेकडा २९.८० प्रतिसाद मिळाला आहे.

२] शिक्षण श्रमातून व्हावे या उत्तराला महत्वांशानुसार शेकडा २७.८० प्रतिसाद मिळाला.

३] शिक्षणातून स्वावलंबी व्हावे या उत्तराला शेकडा २७.६० प्रतिसाद मिळाला म्हणजेच वरील दोन्ही उत्तराना जवळ जवळ सारखाच प्रतिसाद मिळाला आहे.

४] शिक्षण हे केवळ पुस्तकी असू नये या उत्तराला शेकडा १४.८० प्रतिसाद मिळाला म्हणजेच सर्वात कमी प्रतिसाद मिळाला.

यावरुन बापूजीचा पुढीलप्रमाणे शिक्षणविषयक दृष्टीकोण दिसून येतो.
शिक्षण संपादन केल्यामुळे आदर्श व सुसंस्कृत नागरीक निर्माण होतील असे बापूजींना वाटले.
केवळ शिक्षणच न घेता त्याबरोबर श्रम मुल्याची वाढ व्हावी व श्रमाचे महत्व वाढावे अशी बापूजीची अपेक्षा होती. शिक्षण हे केवळ पुस्तकी असता कामा नये. शिक्षण घेतल्यानंतर त्या शिक्षणामुळे स्वावलंबी होता यावे असा त्यांचा दृष्टीकोण होता.

४.२ क] बापूजीचे शिक्षण प्रसार कार्य -

१] बापूजींच्या शिक्षण प्रसाराचे उद्देश -

या विभागात पहिला प्रश्न बापूजींनी शिक्षण प्रसाराचे कार्य हाती का घेतले? असा विचारला होता. त्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे.

बापूजींच्या शिक्षण प्रसाराच्या उद्देशासंबंधी वर्गीकरण.

कोष्टक क्रमांक ४.६

| | महत्वांशानुसार क्रमांक | | | | एकूण | शेकडा प्रतिसाद. |
|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | | |
| १] बहुजन समाजाची मुले शिकावी | ० | ४६ | ४ | ० | ५० | २९.२० |
| २] ज्ञान विज्ञान सुसंस्काराचा प्रसार व्हावा. | ४६ | ४ | ० | ० | ५० | ३९.२० |
| ३] शिक्षण हे समाज जागृतीचे साधन आहे. | ० | ० | ४६ | ४ | ५० | १९.२० |
| ४] शिक्षणाने वैज्ञानिक दृष्टीकोण निर्माण व्हावा. | ४ | ० | ० | ४६ | ५० | १२.४० |
| एकूण | ५० | ५० | ५० | ५० | २०० | १००=०० |

महत्वांशानुसार अनुक्रमांक द्यावयास सांगितल्यामुळे प्रत्येक पर्यायाचा प्रतिसाद काढताना आकडेमोड करावी लागेल. १ ते ४ क्रमांक असल्यामुळे खालील प्रमाणे गुण दिले.

प्रथम निवड ४ गुण.

द्वितीय निवड३ गुण.

तृतीय निवड २ गुण.

चौथी निवड १ गुण.

[ मागील उदाहरणाप्रमाणे एकूण गुण ५०० होतात. ]

बहुजन समाजाची मुले शिकावी या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण.

एकूण गुण = ०×४ + ४६×३ + ४×२ + ०×१

= ० + १३८ + ८ + ०

एकूण गुण = १४६

शेकडा गुण = १४६/५०० × १००/१ = १४६/५ = २९.२०

ज्ञान विज्ञान सुसंस्कार याचा प्रसार व्हावा या उत्तराचे

एकूण गुण = ४६×४ + ४×३ + ०×३ + ०×१

= १८४ + १२ + ० + ०

एकूण गुण = १९६

शेकडा गुण = १९६/५०० × १००/१ = १९६/५ = ३९.२०

शिक्षण हे समाज जागृतीचे साधन बनावे या उत्तराचे.

एकूण गुण = ०×४ + ०×३ + ४६×२ + ४×१

= ० + ० + ९२ + ४

एकूण गुण = ९६

शेकडा गुण = ९६/५०० × १००/१ = ९६/५ = १९.२०

शिक्षणातून वैज्ञानिक दृष्टीकोण निर्माण व्हावा. या उत्तराचे

एकूण गुण = ४×४ + ०×३ + ०×२ + ४६×१

= १६ + ० + ० + ४६

एकूण गुण = ६२

शेकडा गुण = ६२/५०० × १००/१ = ६२/५ = १२.४०

ज्ञान विज्ञान सुसंस्काराचा प्रसार व्हावा या उत्तराला

[शेकडा ३९.२०] प्रतिसाद मिळाला.

बहुजन समाजाची मुले शिकावी या उत्तराला

[शेकडा २९.२०] प्रतिसाद मिळाला.

शिक्षण हे समाज जागृतीचे साधन बनावे या उत्तराला.
शेकडा [१९.२०] प्रतिसाद मिळाला.
शिक्षणाने वैज्ञानिक दृष्टीकोण निर्माण व्हावा या उत्तराला
[ शेकडा १२.४० ] प्रतिसाद मिळाला.

यावरुन बापूजींनी "ज्ञान, विज्ञान, सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार" हे ध्येय वाक्य स्विकारले व बहुजन समाजातील मुलांची शिक्षणाची होत चाललेली आबाळ लक्षात घेवून त्यांच्या शिक्षणाची सोय केली. ज्ञान, विज्ञान, सुसंस्काराचा त्यांच्यामध्ये प्रसार व्हावा या उद्देशाने श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली.

शिक्षण हे समाज जागृतीचे साधन असल्याने शिक्षण प्रसारातून समाज जागृती व वैज्ञानिक दृष्टीकोण निर्माण होण्यासाठी शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतले असल्याचे दिसून येते.

२] <u>बापूजींना शिक्षणक्षेत्रात जाणवलेल्या समस्या -</u>

या विभागातील प्रश्न २ रा बापूजींना बहुजन समाजातील कोणत्या समस्या जाणवल्या होत्या असा विचारला होता.
बापूजींनी समाजाचे जवळून निरीक्षण केले होते. समाजात वावरताना त्याना कांही अनुभव आले होते. ते स्वत: शिक्षक होते. त्यामुळे शिक्षण प्रसार कार्य करतांना त्यांना कांही समस्या जाणवल्या या बाबतचा हा प्रश्न आहे त्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे केले आहे.

<u>बापूजींना जाणवलेल्या समस्यांचे वर्गीकरण</u>

कोष्टक क्रमांक ४.७

| अ.नं. | बापूजींना जाणवलेल्या समस्या | महत्वांशानुसार क्रमांक १ | २ | ३ | ४ | एकूण | शेकडा प्रमाण. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १] | स्त्री शिक्षणाचा अभाव | ३ | ४४ | ३ | ० | ५० | ३०.०० |
| २] | पालकाचे अज्ञान | ० | ३ | ४४ | ३ | ५० | २०.०० |
| ३] | मुलांची शिक्षणाची गैरसोय | ४४ | ३ | ० | ३ | ५० | ३७.६० |
| ४] | समाजातील दारिद्र्य | ३ | ० | ३ | ४४ | ५० | १२.४० |
| | एकूण | ५० | ५० | ५० | ५० | २०० | १००=०० |

महत्वांशानुसार अनुक्रमांक द्यावयास सांगितल्यामुळे प्रत्येक पर्यायांचा प्रतिसाद काढताना आकडेमोड करावी लागेल. १ ते ४ क्रमांक असल्याने खालील प्रमाणे गुण दिले.

प्रथम निवड - ४ गुण

द्वितीय निवड- ३ गुण

तृतीय निवड - २ गुण

चौथी निवड - १ गुण

मागील उदाहरणाप्रमाणे एकूण गुण ५०० होतात.

स्त्री शिक्षण या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण.

एकूण गुण = ३x४ + ४४x३ + ३x२ + ०x१

= १२ + १३२ + ६ + ०

एकूण गुण = १५०

शेकडा गुण = $\frac{१५०}{५००} \times \frac{१००}{१} = \frac{१५०}{५} =$ ३०.००

पालकाचे अज्ञान या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण

एकूण गण = ०x४ + ३x३ + ४४x२ + ३x१

= ०x + ९ + ८८ + ३

ऐकूण गुण = १००

शेकडा गुण = $\frac{१००}{५००} \times \frac{१००}{१} = \frac{२००}{५} =$ २०.००

मुलांची शैक्षणिक गैर सोय या उत्तराचे एकूण गुण शेकडा गुण.

एकूण गुण = ४४×४ + ३×३ + ०×२ + ३×१

= १७६ + ९ + ० + ३

एकूण गुण = १८८

शेकडा गुण = $\frac{१८८}{५००} \times \frac{१००}{१} = \frac{१८८}{५}$ = ३७.६०

समाजातील दारिद्र्य या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण.

एकूण गुण = ३×४ + ०×३ + ३×२ + ४४×१

= १२ + ३ + ६ + ४४

एकूण गुण = ६२

शेकडा गुण = $\frac{६२}{५००} \times \frac{१००}{१} = \frac{६२}{५}$ = १२.४०

१] ग्रामीण भागातील मुलांची शैक्षणिक गैरसोय हीच प्रमुख समस्या, प्रकर्षाने बापूजींना जाणवली. त्याबाबत प्रतिसादकांचा [शेकडा ३७.६०] मिळाला.

२] स्त्री शिक्षणाचा अभाव ही दुसरी समस्या बापूजींना जाणवली त्याबाबत प्रतिसादकांचा [ शेकडा ३० ] प्रतिसाद मिळाला.

३] पालकांचे अज्ञान ही तिसरी समस्या बापूजींना जाणवली. त्याबाबत प्रतिसादकांचा [शेकडा २०] प्रतिसाद मिळाला.

४] समाजातील दारिद्र्य या उत्तराला सर्वात कमी प्रतिसाद मिळाला तो [शेकडा १२.४०] आहे.

यावरून बापूजींना बहुसंख्य मुलांच्या शिक्षणाची गैरसोय होत असल्याचे दिसून आले. स्त्री शिक्षणाबाबत समाज उदासीन होता व पालकांचे अज्ञान त्याला कारणीभूत होते. असे बापूजींना आढळून आले होते. तसेच दारिद्र्यामुळे समाजाचे शिक्षण होत नाही असे त्यांच्या लक्ष्यात आले होते.

३] बापूजींनी शिक्षण प्रसारासाठी केलेले प्रयत्न -

या विभागातील बापूजींनी शिक्षण प्रसारासाठी कोणते प्रयत्न केले असा ३ रा प्रश्न विचारला होता. त्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे.

बापूजीनी शिक्षण प्रसारासाठी केलेल्या प्रयत्नाचे वर्गीकरण.

कोष्टक क्रमांक-४.८

| अ.नं. | बापूजीनी शिक्षण प्रसारार्थ केलेले प्रयत्न. | महत्वांशानुसार क्रमांक १ | २ | ३ | ४ | एकूण | शेकडा प्रतिसाद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १] | माध्य. उच्च, तांत्रिक शिक्षणाची सोय केली. | ३ | ४३ | ४ | ० | ५० | २९.८० |
| २] | विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांची सोय केली. | ४३ | ३ | ० | ४ | ५० | ३७.०० |
| ३] | विद्यार्थ्यांना आर्थिक सहकार्य केले. | | ४ | ४३ | ३ | ५० | २०.२० |
| ४] | शिष्यवृत्या व शैक्षणिक साहित्याची मदत केली. | ४ | ० | ३ | ४३ | ५० | १३.०० |
| | एकूण | ५० | ५० | ५० | ५० | २०० | १००=०० |

महत्वांशानुसार अनुक्रमांक द्यावयास सांगितल्यामुळे प्रत्येक पर्यायाचा प्रतिसाद काढताना आकडेमोड करावी लागेल.

१ ते ४ क्रमांक असल्याने खालील प्रमाणे गुण दिले.

प्रथम निवड ४ गुण.

द्वितीय निवड ३ गुण.

तृतीय निवड २ गुण.

चौथी निवड १ गुण.

मागील उदाहरणाप्रमाणे एकूण गुण ५०० होतात.

माध्यमिक, उच्च, तांत्रिक, शिक्षणाची सोय केली या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण.

एकूण गुण = ३x४ + ४३x३ + ४x२ + ०x१

= १२ + १२९ + ८ + ०

एकूण गुण = १४९

शेकडा गुण = १४९/४०० x १००/१ = १४९/४ = २९.८०

विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची सोय केली या उत्तराचे एकूण गुण.

एकूण गुण = ४३x४ + ३x३ + ०x२ + ४x१

= १७२ + ९ + ० + ४

एकूण गुण = १८५

शेकडा गुण = १८५/४०० x १००/१ = १८५/४ = ३७.००

विद्यार्थ्यांना आर्थिक सवलती दिल्या या उत्तराचे एकूण गुण.

एकूण गुण = ०x४ + ४x३ + ४३x२ + ३x१

= ० + १२ + ८६ + ३

एकूण गुण = १०१

शेकडा गुण = १०१/४०० x १००/१ = १०१/४ = २०.२०

शिष्यवृत्या व शैक्षणिक साहित्याची मदत केली. या उत्तराचे एकूण गुण.

एकूण गुण = ४x४ + ०x३ + ३x२ + ४३x१

= १६ + ० + ६ + ४३

एकूण गुण = ६५

शेकडा गुण = ६५/४०० x १००/१ = ६५/४ = १३.००

१] विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची सोय केली. या उत्तराला प्रतिसादकाकडून सर्वात जास्त प्रतिसाद मिळाला तो [ शेकडा ३७ ] आहे.

२] माध्यमिक, उच्च, तांत्रिक शिक्षणाची सोय केली या उत्तरासाठी [शेकडा, २९.८०] प्रतिसाद मिळाला.

३] विद्यार्थ्यांना आर्थिक सवलती दिल्या या उत्तरासाठी [शेकडा २०.२०] प्रतिसाद मिळाला.

४] शिष्यवृत्ती व शैक्षणिक साहित्याची मदत केली या उत्तरासाठी [ शेकडा १३ ] प्रतिसाद मिळाला आहे.

यावरून बापूजीनी शिक्षण प्रसारासाठी प्रामुख्याने वसतिगृहाची सोय केली. तसेच बहुजनसमाजाच्या मुलांची माध्यमिक शिक्षणाची उच्च शिक्षण व तांत्रिक शिक्षणाची सोय केली. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना आर्थिक मदत व शिष्यवृत्त्या दिल्या असे दिसून येते.

प्रश्नावलीच्या क विभागात एकूण ७ प्रश्न विचारले आहेत. त्यापैकी ३ प्रश्नांचे स्वरूप बंदिस्त आहे. त्यातील उत्तरांना महत्वांशानुसार अनुक्रमांक द्यावयास लावल्याने त्यांची उत्तरे फक्त अनुक्रमांकानेच दिली आहेत. परंतु बाकीचे चार प्रश्न खुल्या स्वरूपाचे आहेत. त्यामध्ये उत्तरे देतांना प्रतिसादकांना वाव आहे. त्यामुळे उत्तरदात्यांनी दिलेल्या उत्तराचे स्वरूप निरनिराळे आहे. यावरून माहितीचे वर्गीकरण खालीलप्रमाणे केले आहे

३] [अ] <u>बापूजीनी माध्यमिक शिक्षण प्रसारासाठी केलेले प्रयत्न</u> –

बापूजीनी माध्यमिक शिक्षण प्रसारासाठी कोणते प्रयत्न केले? या प्रश्नाला प्रतिसादकांच्या आलेल्या उत्तरातून खालील मुद्दे सांगता येतील.

१] खेडयापाडयातील ग्रामस्थांना बापूजीनी शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. तसेच ग्रामस्थांचे सहकार्य मिळविले.

२] माध्यमिक विद्यालयाच्या मान्यतेसाठी शासनाशी लढाऊ वृत्तीने झगडले.

३] ठिकठिकाणी हिंडून लोकवर्गणी जमा केली.

४] शैक्षणिक आदर्श निर्मितीसाठी माध्य विद्यालयांना थोर-पुरुषांची व संतांची नांवे दिली.

५] माध्यमिक विद्यालयात, वाचनालय, क्रिडांगण, पिण्याच्या पाण्याची सोय, फर्निचर, इ. सुविधा होण्यासाठी सदोदीत परिश्रम घेतले.

६] वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने निरनिराळ्या उपक्रमांचे अयोजन केले.

७] वसतिगृहातील विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा निर्माण केली.

यावरून बापूजींना माध्यमिक शिक्षण प्रसारासाठी सामान्य जनतेला माध्यमिक शिक्षणाचे महत्व पटवून द्यावे लागले. हायस्कूल मान्यतेसाठी शासनाशी झगडावे लागले. हायस्कूलसाठी लोक वर्गणी जमा करावी लागली. हायस्कूलच्या विकासासाठी हायस्कूलमध्ये निरनिराळ्या सुवधिा, सोयी, निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावे लागले. त्यांनी ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची गैर सोय लक्ष्यात घेवून वसतिगृहे काढली. शाळांना संताची व थोर पुरूषांची नांवे दिली. इत्यादी प्रयत्नामधून माध्यमिक शिक्षणाचा प्रसार घडवून आणला असे दिसते.

२ [ब] <u>बापूजीनी उच्च शिक्षणाच्या प्रसारासाठी केलेले प्रयत्न -</u>

उच्च शिक्षणाच्या प्रसारासाठी बापूजीनी कोणते प्रयत्न केले. या प्रश्नाला प्रतिसादकांच्या आलेल्या उत्तरातून खालील मुद्दे सांगता येतील.

१] महाविद्यालये काढण्यासाठी ठिकठिकाणी फिरून उच्च शिक्षणासाठी जनमत तयार केले.

२] जनसंपर्क वाढविण्यासाठी पायी दौरे काढून अहोरात्र कठोर परिश्रम घेतले.

३] महाविद्यालये काढण्यासाठी ग्रामस्थाचे सहकार्य मिळविले व संस्थेसाठी जमलेल्या निधीचा त्यासाठी वापर केला.

४] कॉलेज इमारती व इतर सोयी निर्माण करण्यासाठी विद्यार्थी श्रमदानातून विकास घडवून आणला.

५] योग्य पात्रता धारक, आदर्श, मेहनती प्राध्यापकवर्ग नेमला व त्यांच्याकडून विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास प्रवृत्त केले.

६] स्वतःच्या विचाराचे मेहनती कार्यकर्ते तयार केले व कार्यक्षम अशा कार्यकर्त्याकडून शाखांचा विस्तार व विकास घडवून आणला.

७] महाविद्यालयातून कला, वाणिज्य, शास्त्र या पदवी शिक्षणाची व कांही कॉलेजातून पदव्युत्तर शिक्षणाची सोय केली.

८] महाविद्यालयातून निरनिराळ्या योजना राबविल्या.

यावरुन उच्च शिक्षण प्रसार व्हावा म्हणून कला, वाणिज्य, शास्त्र या पदवी शिक्षणासाठी महाविद्यालये काढली, त्यासाठी त्यांना फिरती दौरे काढून लोकांचे सहकार्य मिळवावे लागले. जमा केलेल्या देणग्यामधून त्यांनी महाविद्यालयांचा विकास घडवून आणला. तसेच महाविद्यालयातून निरनिराळ्या योजना राबविल्या अशा विविध प्रयत्नामधून बापूजींनी उच्च शिक्षणाचा प्रसार घडवून आणला असे दिसते.

३. [क] बापूजींनी तांत्रिक शिक्षण प्रसारासाठी केलेले प्रयत्न.

तांत्रिक शिक्षणाच्या प्रसारासाठी बापूजींनी कोणते प्रयत्न केले या प्रश्नाला प्रतिसादकांच्या आलेल्या उत्तरातून खालील मुद्दे सांगता येतात.

१] तंत्र शिक्षणाचे महत्व पटवून दिले.

२] तंत्र विद्यालये काढून त्यामध्ये प्रशिक्षीत शिक्षक नेमले व त्यांच्याकडून विद्यार्थ्यांमध्ये तंत्र शिक्षण घेण्याची गोडी निर्माण करण्याचे प्रयत्न केले.

३] तंत्र शिक्षणाच्या सुविधा निर्माण करण्यासाठी स्वतंत्र तंत्र प्रयोगशाळा काढल्या.

४] विद्यार्थ्यांची तंत्र कौशल्ये विकसीत करण्यासाठी अत्याधुनिक साहित्याचा पुरवठा केला.

५] पाटण येथे तंत्रनिकेतन सुरु केले.

यावरून बापूजींनी तंत्रविद्यालये काढून सरकारी तंत्रशिक्षण प्रसारास हातभार लावला असे दिसते. तसेच त्यांनी तंत्र शिक्षणाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले व तंत्रशिक्षण घेण्यास त्यांना प्रेरणा दिली असे दिसून येते.

३.ड] बापूजींनी शिक्षक प्रशिक्षणासाठी केलेले प्रयत्न -

अ] शिक्षकाविषयी बापूजींच्या अपेक्षा -

शिक्षकापासून बापूजींना कोणत्या अपेक्षा होत्या ? या प्रश्नाला प्रतिसादकांच्या आलेल्या उत्तरातून खालील मुद्दे सांगता येतात.

१] शिक्षक प्रामाणिक, त्यागी, ध्येयनिष्ठ, आदर्शवादी व सतत ज्ञानाची उपासना करणारा असावा.

२] शिक्षकाने सामाजिक बांधिलकीची जाण ठेवावी. यावरून शिक्षक आदर्शवादी , ध्येयनिष्ठ, त्यागी, प्रामाणिक असावा अशा बापूजींना शिक्षकाविषयी अपेक्षा होत्या.

बापूजींनी शिक्षक प्रशिक्षणासाठी केलेले प्रयत्न.

शिक्षक प्रशिक्षणासाठी बापूजींनी कोणते प्रयत्न केले. या प्रश्नाला प्रतिसादकांच्या आलेल्या उत्तरातून खालील मुद्दे सांगता येतात.

१] शिक्षकांचा अध्यापनाचा दर्जा सुधारण्यासाठी सेवान्तर्गत प्रशिक्षणासाठी संधी दिली.

२] बापूजींनी प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी आठ अध्यापक विद्यालये व माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी ३ अध्यापक महाविद्यालये काढली.

३] शिक्षकांच्या वेतनश्रेणीसाठी व सेवा शास्वती मिळवून देण्यासाठी सदोदीत प्रयत्न केले.

४] शिक्षकांचे निरनिराळे प्रश्न सोडवण्यासाठी, एकमेकांच्या विचारांची देवाण घेवाण होण्यासाठी संस्कार शिबीरे भरविली व अशा शिबीरातून बापूजी मार्गदर्शनपर आपले विचार प्रगट करीत एकमेकांमध्ये चर्चा घडवून आणीत.

५] शिक्षकासाठी पत संस्था स्थापन करून त्यातून माफक दराने कर्ज देवून शिक्षकांना प्रशिक्षणासाठी पाठविले.

यावरून बापूजीनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षकाच्या प्रशिक्षणासाठी महाविद्यालये काढली व त्यांच्या प्रशिक्षणाचा प्रश्न सोडविला. तसेच शिक्षकांचा अध्यापनाचा दर्जा सुधारता येण्यासाठी प्रयत्न केले. शिक्षकासाठी संस्कार शिबीरे भरवून त्यामध्ये मार्गदर्शनपर चर्चा घडवून शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केले. यावरून शिक्षकाबद्दल त्यांना सहानुभूती असल्याचे दिसून येते.

४.२ ड] बापूजीचे स्त्री शिक्षणाबाबतचे कार्य -

प्रश्नावलीच्या ड विभागात बापूजींच्या स्त्री शिक्षण कार्याबाबत तीन प्रश्न विचारले होते.

१] स्त्री शिक्षणाच्या समस्या -

या विभागात स्त्री शिक्षणाबाबत बापूजीनी कोणत्या समस्या जाणवल्या असा पहिला प्रश्न विचारला होता. त्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे.

स्त्री शिक्षणाबाबत बापूजीना आलेल्या समस्याचे वर्गीकरण.

कोष्टक क्रमांक- ४.१

| अ.नं. | स्त्री शिक्षणबाबत बापूजींना आलेल्या समस्या | महत्वांशानुसार क्रमांक १ | २ | ३ | ४ | एकूण | शेकडा प्रतिसाद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १] | मुलींच्या राहाण्या जेवण्याची गैरसोय | ० | ३ | ४० | ७ | ५० | १९.२० |
| २] | पालकांचा मागास दृष्टीकोण | ३ | ४० | ७ | ० | ५० | २९.२० |
| ३] | मुलींच्या शाळेची गैरसोय | ४० | ७ | ० | ३ | ५० | ३६.८० |
| ४] | पालकांची बिकट आर्थिक स्थिती | ७ | ० | ३ | ४० | ५० | १४.८० |
| - | एकूण | ५० | ५० | ५० | ५० | २०० | १००.०० |

महत्वांशानुसार अनुक्रमांक द्यावयास सांगितल्यामुळे प्रत्येक पर्यायाचा प्रतिसाद काढताना १ ते ४ क्रमांक असल्याने त्यांना खालील प्रमाणे गुण दिले.

प्रथम निवड = ४ गुण

द्वितीय निवड = ३ गुण

तृतीय निवड = २ गुण

चौथी निवड = १ गुण

मागील उदाहरणाप्रमाणे एकूण ५०० गुण होतात.

मुलींच्या राहाण्या जेवण्याची गैरसोय या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण.

एकूण गुण = ०×४ + ३×३ + ४०×२ + ७×१

= ० + ९ + ८० + ७ = ९६

एकूण गुण = ९६

शेकडा गुण = $\frac{९६}{५००} \times \frac{१००}{१} = \frac{९६}{५} =$ १९.२०

पालकांचा मागास दृष्टीकोन या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण.

एकूण गुण = ३×४ + ४०×३ + ७×२ + ०×१

= १२ + १२० + १४ + ०

एकूण गुण = १४६

शेकडा गुण = $\frac{१४६}{५००} \times \frac{१००}{१} = \frac{१४६}{५} =$ २९.२०

मुलींच्या शाळेची गैरसोय या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण.

एकूण गुण = ४०×४ + ७×३ + ०×२ + ३×१

= १६० + २१ + ० + ३

एकूणगुण = १८४

शेकडा गुण = $\frac{१८४}{५००} \times \frac{१००}{१} = \frac{१८४}{५} =$ ३६.८०

पालकांची बिकट आर्थिक स्थिती या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण.

एकूण गुण = ७×४ + ०×३ + ३×२ + ४०×१

= २८ + ० + ६ + ४०

एकूण गुण = ७४

शेकडा गुण = $\frac{७४}{५००} \times \frac{१००}{१} = \frac{७४}{५}$ = १४.८०

मुलींच्या शाळेची गैरसोय या उत्तरासाठी महत्वांशानुसार सर्वात जास्त प्रतिसाद मिळाला तो [शेकडा ३६.८०] होता. पालकांचा मागास दृष्टीकोण या उत्तरासाठी महत्वांशानुसार दुसऱ्या क्रमांकाचा प्रतिसाद मिळाला. तो [शेकडा २९.८०] होता. मुलींच्या राहाण्याजेवण्याची गैरसोय या उत्तरासाठी महत्वांशानुसार तिसऱ्या क्रमांकाचा प्रतिसाद मिळाला तो [शेकडा १९.२०] होता. पालकांची बिकट आर्थिक स्थिती या उत्तरासाठी सर्वात कमी प्रतिसाद मिळाला तो [ शेकडा १४.८०] होता.

स्त्री शिक्षणाबाबत बापूजींना प्रामुख्याने मुलींच्या शाळेची गैरसोय जाणवली. त्याखालोखाल पालकांचा मागासदृष्टीकोण जाणवला व त्यानंतर मुलींच्या राहाण्या जेवण्याची गैरसोय ही समस्या जाणवली.
पालकांची बिकट आर्थिक स्थिती ही समस्या सुध्दा बापूजीना स्त्री शिक्षणाबाबत दिसून आली.

२] <u>बापूजीनी स्त्री शिक्षण प्रसारासाठी केलेले प्रयत्न.</u>

या विभागात स्त्री शिक्षण प्रसारासाठी बापूजींनी कोणते प्रयत्न केले? असा दुसरा प्रश्न विचारला होता. त्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे केले आहे.

## बापूजींच्या स्त्री शिक्षणाबाबतच्या प्रयत्नांचे वर्गीकरण.

कोष्टक क्रमांक ४.१०

| अ.नं. | बापूजींचे स्त्री शिक्षणाबाबतचे प्रयत्न. | महत्वांशानुसार क्रमांक | | | | एकूण | शेकडा प्रतिसाद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | | |
| १] | मुलींना मोफत शिक्षण दिले. | ० | २ | ३६ | १२ | ५० | १८.०० |
| २] | मुलींसाठी वसतिगृहे काढली. | ३६ | १२ | ० | २ | ५० | ३६.४० |
| ३] | प्रौढ स्त्रीयांसाठी वर्ग चालवले. | २ | ० | १२ | ३६ | ५० | १३.६० |
| ४] | स्त्री शिक्षणाचे महत्व पटवून दिले | १२ | ३६ | २ | ० | ५० | ३२.०० |
| | एकूण | ५० | ५० | ५० | ५० | २०० | १००=०० |

महत्वांशानुसार अनुक्रमांक द्यावयास सांगितल्यामुळे प्रत्येक पर्यायांचा प्रतिसाद काढतांना १ ते ४ क्रमांक असल्याने त्याना खालीलप्रमाणे गुण दिले.

प्रथम निवड = ४ गुण.

द्वितीय निवड = ३ गुण.

तृतीय निवड = २ गुण .

चौथी निवड = १ गुण.

मागील उदाहरणाप्रमाणे एकूण गुण ५०० होतात.

मुलींना मोफत शिक्षण दिले या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण .

एकूण गुण = ०×४ + २×३ + ०×२ + १२×१

= ० + ६ + ७२ + १२ = ९०

एकूण गुण = ९०

शेकडा गुण = $\frac{९०}{५००} \times \frac{१००}{१} = \frac{९०}{५} = १८$

मुलींसाठी वसतिगृहे काढली या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण.

एकूण गुण = ३६×४ + १२×३ + ०×२ + २×१

= १४४ + ०३६ + ० + २ = १८२

एकूण गुण = १८२

शेकडा गुण = $\frac{१८२}{५००} \times \frac{१००}{१} = \frac{१८२}{५} = ३६.४०$

प्रौढ स्त्रीयासाठी वर्ग चालवले या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण.

एकूण गुण = २x४ + ०x३ + १२x२ + ३६x१

= ८ + ० + २४ + ३६ = ६८

एकूण गुण = ६८

शेकडा गुण = $\frac{६८}{५००} \times \frac{१००}{१} = \frac{६८}{५}$ = १३.६०

स्त्री शिक्षणाचे महत्व पटवून दिले या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण.

एकूण गुण = १२x४ + ३६x३ + २x२ + ०x१

= ४८ + १०८ + ४ + ० = १६०

एकूण गुण = १६०

शेकडा गुण = $\frac{१६०}{५००} \times \frac{१००}{१} = \frac{१६०}{५}$ = ३२

१] मुलीसाठी वसतिगृहे काढली या पर्यायाला महत्वांशानुसार प्रथम क्रमांकाचा प्रतिसाद मिळाला. तो [शेकडा ३६.४०] होता.

२] स्त्री शिक्षणाचे महत्व पटवून दिले या पर्यायाला महत्वांशानुसार दुस-या क्रमाकाचा प्रतिसाद मिळाला. तो [शेकडा ३२ ] होता.

३] मुलीना मोफत शिक्षण दिले या पर्यायाला महत्वांशानुसार तिस-या क्रमांकाचा प्रतिसाद मिळाला. तो [ शेकडा १८ ] होता.

४] प्रौढ स्त्रीयासाठी वर्ग चालवले या पर्यायाला महत्वांशानुसार सर्वात कमी प्रतिसाद मिळाला. तो [शेकडा १३.६०] होता.

यावरून बापूजीनी स्त्री शिक्षण प्रसारासाठी , मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून मुलीसाठी वसतिगृहे काढण्यावर जास्त भर दिला. तसेच त्यानी स्त्री शिक्षणाचे महत्व पटवून देण्यासाठी प्रयत्न केले. मुलीना मोफत शिक्षण देण्याचा व प्रौढ स्त्रीयांना साक्षर करण्याचा ही त्यांचा प्रयत्न दिसून येतो.

३] बापूजींचा स्त्री शिक्षणाबाबतचा दृष्टीकोन

या विभागात स्त्री शिक्षणाबाबत बापूजींचे काय मत होते? असा तिसरा प्रश्न विचारला होता. त्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे केले आहे.

स्त्री शिक्षणाबाबत बापूजींच्या दृष्टीकोणाचे वर्गीकरण.

कोष्टक क्रमांक ४.११.

| अ.नं. | स्त्री शिक्षणाबाबत बापूजींचा दृष्टीकोन. | महत्वांशानुसार क्रमांक १ | २ | ३ | एकूण | शेकडा प्रतिसाद. |
|---|---|---|---|---|---|---|
| १] | स्त्रीयांनी पुरुषाप्रमाणे सर्व क्षेत्रात काम करावे. | ४ | ४१ | ५ | ५० | ३३=०० |
| २] | स्त्री शिक्षणाने समाज सुधारेल. | ४१ | ५ | ४ | ५० | ४५=६६ |
| ३] | स्त्री हा राष्ट्र उध्दाराचा महत्वाचा घटक आहे. | ५ | ४ | ४१ | ५० | २१=३४ |
| | | ५० | ५० | ५० | १५० | १००=०० |

महत्वांशानुसार अनुक्रमांक द्यावयास सांगितल्यामुळे प्रत्येक पर्यायाचा प्रतिसाद काढताना १ ते ३ क्रमांक असल्याने खालील प्रमाणे गुण दिले.

प्रथम निवड = ३ गुण.

द्वितीय निवड = २ गुण.

चौथी निवड = १ गुण.

या ठिकाणी १ ते ३ क्रमांक असल्याने

एकूण गुण = ५०x३ + ५०x२ + ५०x१
= १५० + १०० + ५० = ३००

एकूण गुण = ३०० होतात.

स्त्रीयांनी पुरुषाप्रमाणे सर्व क्षेत्रात काम करावे या उत्तराचे

एकूण गुण = ४x३ - ४१x२ - ५x१

एकूण गुण = १२ - ८२ - ५ = ९९

शेकडा गुण = $\frac{९९}{३००}$ x $\frac{१००}{१}$ = $\frac{९९}{३}$ = ३३=००

स्त्री शिक्षणाने समाज सुधारेल या उत्तराचे एकूण गुण.

एकूण गुण = ४१x३ - ५x२ - ४x१

एकूण गुण = १२३ - १० - ४ = १३७

शेकडा गुण = $\frac{१३७}{३००}$ x $\frac{१००}{१}$ = $\frac{१३७}{३}$ = ४५. ६६

३] स्त्री हा राष्ट्र उध्दाराचा महत्वाचा घटक आहे या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण.

एकूण गुण = ५x३ - ४x२ - ४१x५

एकूण गुण = १५ - ८ - ४१ = ६४

शेकडा गुण = $\frac{६४}{३००}$ x $\frac{१००}{१}$ = $\frac{६४}{३}$ = २१. ३४

१] स्त्री शिक्षणाने समाजसुधारेल या उत्तरासाठी सर्वात जास्त प्रतिसाद मिळाला. [शेकडा ४५. ६६]

२] स्त्रीयांना पुरुषाप्रमाणे सर्व क्षेत्रात काम करावे या उत्तरासाठी महत्वांशानुसार दुस-या अनुक्रमांकाचा प्रतिसाद मिळाला [शेकडा ३३=००]

३] स्त्री हा राष्ट्र उध्दाराचा महत्वाचा घटक या उत्तरासाठी सर्वात कमी प्रतिसाद मिळाला [शेकडा २१. ३४]

यावरुन स्त्री शिक्षणाने समाज सुधारेल या विचारावर बापूजींचा जास्त भर होता. तसेच स्त्रीयांनी पुरुषाप्रमाणे सर्व क्षेत्रात काम करावे असे बापूजींना वाटत होते. स्त्री हा राष्ट्र उध्दाराचा महत्वाचा घटक आहे असे बापूजीचे मत होते.

४.२ ब] बापूजींचे वसतिगृहा संबंधी कार्य -

वसतिगृहातील मुलांचा आहार, व्यायाम, नेतृत्व गुण वाढीसाठी, व प्रतिष्ठा निर्माण होण्यासाठी बापूजींनी कोणते प्रयत्न केले. याबाबतची माहिती मिळविण्यासाठी एकूण चार प्रश्न विचारले होते.

१] वसतिगृहातील आहार -

या विभागात वसतिगृहातील मुलांचा आहार कसा असावा याबाबत बापूजींचे काय मत होते. असा पहिला प्रश्न विचारला होता. त्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे केले आहे.

वसतिगृहातील मुलांच्या आहाराचे वर्गीकरण.

कोष्टक क्रमांक: ४.१२

| अ. नं. | वसतिगृहातील मुलांचा आहार. | प्रतिसाद | शेकडा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| १] | साधा पण पौष्टिक | ४५ | ७५ |
| २] | चमचमीत | ०० | ०० |
| ३] | पचनास हलका . | १५ | २५ |
| | एकूण | ६० | १०० |

टिप - कांही प्रतिसादकांनी एकापेक्षा अधिक वर्णाक्षरासमोर खुणा केल्या आहेत. त्यामुळे एकूण संख्या अधिक येते.

वसतिगृहातील मुलांचा आहार साधा पण पौष्टिक होता असे शेकडा ७५ प्रतिसादकांचे म्हणणे होते. तर शेकडा २५ प्रतिसादकांचे म्हणणे आहार पचनास हलका होता.

यावरून वसतिगृहातील मुलांना साधा पण पौष्टिक आहार देण्यावरच बापूजींचे लक्ष होते असे दिसून येते. त्याचबरोबर तो पचनास हलका असावा या बाबीकडे ही त्यांचे लक्ष असे.

या विभागात वसतिगृहातील मुलांसाठी बापूजी कोणत्या व्यायामाची अपेक्षा करत असा दुसरा प्रश्न विचारला होता. त्याचे वर्गीकरण खालील प्रमाणे केले आहे.

2] वसतिगृहातील व्यायाम -

वसतिगृहातील व्यायाम प्रकाराचे वर्गीकरण.

कोष्टक क्रमांक - ४.१३

| अ.नं. | व्यायाम प्रकार | प्रतिसाद | शेकडा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| १] | पळणे | ३५ | ५८.३३ |
| २] | पोहणे | १५ | २५.०० |
| ३] | कुस्ती | १० | १६.६६ |
| | एकूण | ६० | १००=०० |

[टिप - कांही प्रतिसादकांनी एकापेक्षा अधिक वर्गाधारासमोर खुण केली आहे. त्यामुळे एकूण संख्या ५० पेक्षा अधिक येते] पळणे या व्यायाम प्रकारास सर्वात जास्त प्रतिसाद मिळाला.

त्याचे शेकडा प्रमाण ५८.३३ आहे.

पोहणे या व्यायाम प्रकारात [शेकडा २५] प्रतिसाद मिळाला. तर कुस्ती या व्यायाम प्रकाराबद्दल [शेकडा १६.६६] प्रतिसाद मिळाला.

यावरून पळणे हाच व्यायाम प्रकार उत्तम आहे त्यावर विद्यार्थ्यांनी भर द्यावा असे बापूजींना वाटे त्याबरोबरच पोहणे व कुस्ती या व्यायामाची ही अपेक्षा विद्यार्थ्यांकडून बापूजी करीत असे दिसून येते.

३] <u>वसतिगृहातील विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण वाढीसाठी केलेले प्रयत्न.</u>

या विभागात बापूजींनी विद्यार्थ्यांत नेतृत्व गुणाची वाढ होण्यासाठी वसतिगृहात कोणत्या योजना आखल्या असा तिसरा प्रश्न विचारला होता. त्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे.

<u>वसतिगृहातील विद्यार्थ्यांत नेतृत्व गुणाच्या वाढीसाठी केलेल्या प्रयत्नांचे वर्गीकरण.</u>

कोष्टक क्रमांक ४. १४

| अ. नं. | नेतृत्व गुण वाढीसाठी केलेले प्रयत्न | प्रतिसाद | शेकडा प्रतिसादक |
|---|---|---|---|
| १. | नेत्याची भाषणे ऐकवित असत. | १५ | २५ |
| २. | मुलांचे मंत्रीमंडळ तयार करीत. | २५ | ४१. ६६ |
| ३. | थोर पुरूषांच्या जयंत्या साजऱ्या करीत. | २० | ३३. ३३ |
| | एकूण | ६० | १००=०० |

टिप - कांही प्रतिसादकांनी एकापेक्षा अधिक वर्णाक्षरासमोर खूण केली आहे. त्यामुळे एकूण संख्या ५० पेक्षा अधिक होते. ]

मुलांचे मंत्रीमंडळ तयार करीत. त्यामुळे विद्यार्थ्यांत एखाद्या विभागाची जबाबदारी पेलण्याची कुवत यावी असा बापूजींचा हेतू होता. या प्रयत्नास सर्वात जास्त प्रतिसाद मिळाला. त्याचे [शेकडा प्रमाण ४१. ६६] होते. थोर पुरूषांच्या जयंत्या साजऱ्या केल्यामुळे थोर पुरूषांच्या गुणाचे अनुकरण विद्यार्थ्यांना करता येईल असा बापूजींचा हेतू होता. या प्रयत्नास [शेकडा ३३. ३३] प्रतिसाद मिळाला.

विद्यार्थ्यामध्ये सभाधीट पणा येण्यासाठी निरनिराळ्या वकृत्व स्पर्धा आयोजित करुन विद्यार्थ्यांना निरनिराळ्या नेत्यांची भाषणे ऐकविल असत या प्रयत्नास [शेकडा २५ ] प्रतिसाद मिळाला.

यावरुन निरनिराळ्या प्रयत्नाद्वारे बापूजी विद्यार्थ्यात नेतृत्व गुणांची वाढ होण्यासाठी मुलांचे मंत्रीमंडळ बनवून एखाद्या खात्याची त्यांच्यावर जबाबदारी देत, थोर पुरुषांचे जन्म दिन साजरे करुन त्यांच्यात स्फूर्ती, चारित्र्य निर्मिती करीत त्याचबरोबर वक्तृत्व स्पर्धाद्वारे सभाधीटपणा निर्माण करण्याचा प्रयत्न करीत.

४] वसतिगृहातील मुलामध्ये श्रमाची आवड -

या विभागात बापूजीनी विद्यार्थ्यात श्रमाची आवड निर्माण व्हावी म्हणून कोणते प्रयत्न केले? हे जाणून घेण्यासाठी चवथा प्रश्न विचारला होता. त्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे केले आहे.

बापूजीनी विद्यार्थ्यात श्रमाची आवड निर्माण होण्यासाठी केलेल्या प्रयत्नाचे वर्गीकरण.

कोष्टक क्रमांक ४.१५

| अ.नं. | प्रयत्न | प्रतिसाद | शेकडा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| १] | उन्हाळ्याच्या सुट्टीत आर्थिक साहाय्य मिळण्यास काम दिले. | १५ | २५ |
| २] | संस्थेच्या शेतावर काम दिले. | २४ | ४० |
| ३] | कमवा व शिका योजना राबविली | ६ | १० |
| ४] | जेवणापूर्वी एक तास काम दिले. | १५ | २५ |
| | एकूण | ६० | १०० |

[टिप - कांही प्रतिसादकांनी एकापेक्षा अधिक वर्णाक्षरासमोर खुणा केल्या आहेत. त्यामुळे एकूण संख्या अधिक येते. ]

बापूजी विद्यार्थ्यांना संस्थेच्या शेतावर काम उपलब्ध करून देत असत असे जास्तीत जास्त प्रतिसादकांचे म्हणणे होते. त्याचे शेकडा प्रमाण ४० आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीत विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय्य मिळण्यास काम उपलब्ध करून देत असत असे शेकडा २५ प्रतिसादकांनी सांगितले. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना दररोजच्या जेवणाच्या वेळेपूर्वी एक तास काम देत असत. असे शेकडा २५ प्रतिसादकांचे मत होते. यावरून बापूजी विद्यार्थ्यांमध्ये श्रमाविषयी आवड निर्माण करण्यासाठी संस्थेच्या शेतावर काम देत. उन्हाळ्याच्या सुट्टीत ते विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय्य मिळण्यासाठी शेती मशागत, छापखान्यातील कामे देत.

४.२ ई] बापूजींचे समाज परिवर्तन व जातीभेद निर्मूलनासंबंधी कार्य -

१] बापूजी विषयीचे विविध समाजघटकातील मत-

या विभागात एकूण तीन प्रश्न विचारले होते. त्यापैकी पहिला प्रश्न विविध समाज घटकात बापूजी विषयी कोणत्या भावना होत्या? या प्रश्नाच्या उत्तराचे वर्गीकरण खालीलप्रमाणे केले आहे.

बापूजी साळुंखे यांच्या विषयीच्या विविध समाजघटकातील प्रतिक्रीयांचे वर्गीकरण.

कोष्टक क्रमांक ४.१६

| अ.नं. प्रतिसादकांचे स्वरूप | सुशिक्षित समाजात | | विद्यापीठ वर्तुळात | | सर्वसामान्य जनतेमध्ये | | सरकारी दरबारात | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
| १] शिक्षण प्रसारक | ३१ | ६२ | ६ | १२ | ८ | १६ | ६ | १२ |
| २] शिक्षण तज्ञ | ८ | १६ | ३६ | ७२ | ५ | १० | ५ | १० |
| ३] समाज सुधारक | ६ | १२ | ५ | १० | ७ | १४ | ३५ | ७० |
| ४] उध्दारकर्ता | ५ | १० | ३ | ६ | ३० | ६० | ४ | ८ |
| एकूण | ५० | १०० | ५० | १०० | ५० | १०० | ५० | १०० |

वरील कोष्टक क्रमांक ४.१६ वरून विद्यापीठ वर्तुळात बापूजी एक शिक्षण तज्ञ होते अशी भावना शेंकडा -७२ ] प्रतिसादकांनी व्यक्त केली.

मागील कोष्टक क्रमांक ४. १६ वरून सरकारी दरबारात बापूजी एक समाजसुधारक होते अशी भावना होती यास [शेकडा ७० ] प्रतिसाद मिळाला.

मागील कोष्टक क्रमांक ४. १६ वरून सुशिक्षीत समाज बापूजीना शिक्षण प्रसारक मानीत या उत्तरास [शेकडा ६२] प्रतिसाद मिळाला.

मागील कोष्टक क्रमांक ४. १६ वरून सर्व सामान्य जनतेला बापूजी आपले उध्दार कर्ते आहेत असे वाटले या उत्तरास [शेकडा ६० ] प्रतिसाद मिळाला.

यावरून विद्यापीठ क्षेत्रात बापूजीना एक शिक्षणतज्ञ मानले जात होते. शासनाच्या दृष्टीने ते एक समाजसुधारक होते. सुशिक्षीत समाज त्याना शिक्षण प्रसारक मानी. तर सामान्य जनतेमध्ये ते उध्दारकर्ते होते अशी भावना होती असे दिसून येते.

२] <u>बापूजीनी सामाजिक एकतेसाठी केलेले प्रयत्न</u> -

या विभागात बापूजीनी सामाजिक एकता साधण्यासाठी कोणते प्रयत्न केले असा दुसरा प्रश्न विचारला होता त्या उत्तराचे वर्गीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

<u>बापूजीनी सामाजिक एकतेसाठी केलेल्या प्रयत्नांचे वर्गीकरण.</u>

कोष्टक क्रमांक ४. १७

| अ. नं. | सामाजिक एकतेसाठी केलेले प्रयत्न. | महत्वांशानुसार क्रमांक १ | २ | ३ | ४ | एकूण | शेकडा प्रतिसाद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १] | एकाच वसतिगृहात सर्व जातीच्या मुलाना प्रवेश दिला. | ७ | ३८ | ५ | ० | ५० | ३०. ४० |
| २] | संस्थेच्या सेवेत घेताना सर्व जातीच्या उमेदवारांना संधी दिली. | ३८ | ७ | ० | ५ | ५० | ३५. ६० |
| ३] | सार्वजनिक स्वच्छतेसाठी प्रयत्न केले. | ५ | ० | ७ | ३८ | ५० | १४. ४० |
| ४] | प्रभात फे-यासारखे कार्यक्रम अवलंबिले. | ० | ५ | ३८ | ५ | ५० | १९. ६० |
| | एकूण | ५० | ५० | ५० | ५० | २०० | १००. ०० |

मागील कोष्टक क्रमांक ४.१७ वरून प्रत्येक प्रयत्नाचे महत्त्वांश काढले व प्रत्येक पर्यायांचा प्रतिसाद काढताना १ ते ४ क्रमांक असल्याने खालील प्रमाणे गुण काढले.

प्रथम निवड - ४ गुण.

द्वितीय निवड - ३ गुण.

तृतीय निवड - २ गुण.

चौथी निवड - १ गुण.

एकूण गुण - ५०० होतात.

एकाच वसतिगृहात सर्व जातीच्या मुलांना प्रवेश दिला. या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण.

एकूण गुण = ७x४ + ३८x३ + ५x२ + ०x१

एकूण गुण = २८ + ११४ + १० + ० = १५२

शेकडा गुण = १५२/५०० x १००/१ = १५२/५ = ३०.४०

संस्थेच्या सेवेत घेताना सर्व जातीच्या उमेदवारांना संधी दिली. या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण.

एकूण गुण = ३८x४ + ७x३ + ०x२ + ५x१

एकूण गुण = १५२ + २१ + ० + ५ =१७८

शेकडा गुण = १७८/५०० x १००/१ = १७८/५ = ३५.६०

सार्वजनिक स्वच्छतेसाठी प्रयत्न केले या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण.

एकूण गुण = ५x४ + ०x३ + ७x२ + ३८x१

एकूण गुण = २० + ० + १४ + ३८ = ७२

शेकडा गुण = ७२/५०० x १००/१ = ७२/५ = १४.४०

प्रभात फे-या सारखे कार्यक्रम अवलंबिले या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण.

एकूण गुण = ०x४ + ५x३ + ३८x२ + ७x१

एकूण गुण = ० + १५ + ७६ + ७ = ९८

शेकडा गुण = ९८/५०० x १००/१ = ९८/५ = १९.६०

यावरून संस्थेच्या सेवेत कर्मचारी भरती करताना कोणत्याही जातीचा विचार न करता सर्व जातीच्या उमेदवारांना संधी दिली असे जास्तीत जास्त प्रतिसादकाचे [शेकडा ३५.६०] म्हणणे होते.

एकाच वसतिगृहात सर्व जातीच्या उमेदवारांना प्रवेश देवून सामाजिक एकता साधण्याचा प्रयत्न केला असे [शेकडा ३०.४०] प्रतिसादकाचे म्हणणे होते.

प्रभात फे-या सारखे कार्यक्रम अवलंबिले या उत्तराला [शेकडा १९.६०] प्रतिसाद मिळाला.

सार्वजनिक स्वच्छतेसाठी प्रयत्न केले या उत्तराला [शेकडा १४.४०] प्रतिसाद मिळाला.

३] <u>बापूजीनी जातीभेद निर्मूलनासाठी केलेले प्रयत्न.</u>

प्रतिसादकांना या प्रश्नात खुली उत्तरे देण्यास वाव असल्याने त्यांनी दिलेल्या उत्तराचे निरनिराळे स्वरूप आहे. त्यासाठी प्रतिसादकांच्या आलेल्या उत्तरातून पुढील मते दिसून येतात.

१] बापूजीनी संस्थेचे व्यवस्थापक मंडळ तयार करताना निरनिराळ्या जातीच्या लोकांना सभासद केले.

२] बापूजी निरनिराळ्या जातीतील मुलाबद्दल आपलेपणा दाखवित त्याचे उदाहरण म्हणजे आबासाहेब कांबळे या हरिजन मुलास त्यांनी स्वत:च्या घरी ठेवून एम्.बी.बीएस्. पर्यंतचे शिक्षण घेण्यास सहकार्य केले.

३] जातीभेद नष्ट होण्यासाठी संस्कार शिबीरे भरविली.

४] वसतिगृहात निरनिराळ्या जातीच्या मुलाना प्रवेश दिला.

५] बापूजीनी संस्थेत कर्मचारी भरताना कोणत्याही जातीच्या उमेदवारांना नोकरीची संधी दिली.

६] श्री संत गाडगेबाबांच्या बरोबर ते जातीभेद निर्मूलन मोहिमेत फिरले. यावरून बापूजीनी सामाजिक एकता निर्माण होण्यासाठी जातीभेद न बाळगता नोकर भरती केली. वसतिगृहात सर्व जातीच्या मुलाना प्रवेश दिला. तसेच जातीभेद नष्ट होण्यासाठी संस्कार शिबीरे भरविली असल्याचे दिसून येते.

### ४.३ मुलाखतीच्या साहाय्याने मिळविलेल्या माहितीचे पृथ:करण व अर्थ निर्वचन.

अभ्यासकाने एकूण ४० व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या. शिक्षण महर्षि डॉ. बापूजींच्या निकट सहवासात असलेल्या व्यक्तींची मुलाखतीसाठी निवड केली होती. त्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १] | संस्थेचे आजीव सदस्य | - | ५ |
| २] | प्राचार्य | - | ६ |
| ३] | प्राध्यापक | - | १० |
| ४] | मुख्याध्यापक | - | ३ |
| ५] | शिक्षक | - | १२ |
| ६] | शिक्षकेतर कर्मचारी | - | ४ |
| | | एकूण | ४० |

[ मुलाखत घेतलेल्या व्यक्तींची यादी परिशिष्ट ५ मध्ये दिली आहे. ] अभ्यासकाने मुलाखत अनुसूची तयार केली होती. [ ती परिशिष्ट ३ मध्ये दिली आहे. ] मुलाखत अनुसूचीच्या साहाय्याने विचारलेल्या प्रश्नाचे पृथ:करण व अर्थ निर्वचन पुढीलप्रमाणे केले आहे.

अ] बापूजींचे व्यक्तीगत जीवन -

शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांची राहाणी अत्यंत साधी होती. तसेच त्यांचा आहार पण साधा होता [ असा शेकडा ९६ प्रतिसाद मिळाला ] बापूजी स्वत:ची कामे स्वत: करीत. सचोटीने व काटकसरीने वागत. त्यांना लहानपणीच मातापित्याच्या मायेला पोरके व्हावे लागले. त्यामुळे गरीबाविषयी त्याना तळमळ वाटत असे. ते लहानपणापासून हुशार, जिद्दी, चिकित्सक होते. [ याबाबत शेकडा ९५ प्रतिसाद मिळाला. ]

स्वामी विवेकानंद व महात्मा गांधी यांच्या विचार सरणीचा बापूजींच्या वर प्रभाव पडला होता. [असे शेकडा ९० प्रतिसादकांनी सांगितले ]
कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याबरोबर काम केल्यामुळे बहूजन समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार करावा ह्या विचारास प्रेरणा मिळाली.
बापूजींना संस्थेच्या कामासाठी नेहमी बाहेर गांवी फिरावे लागे, त्यामुळे कौटुंबिक जीवन त्यांना उपभोगता आले नाही. संस्थेच्या वाढत्या कार्य-विस्तारामुळे संसाराकडे त्यांचे सतत दुर्लक्ष झाले. सर्वस्वाचा त्याग त्यांनी संस्थेसाठी केला. त्याग हेच त्यांचे बळ होते. असे बहूसंख्य प्रतिसादकांनी सांगितले.

ब] <u>बापूजींचे शिक्षण प्रसार कार्य -</u>

माध्यमिक, उच्च, तांत्रिक, शिक्षक प्रशिक्षण प्रसारासाठी बापूजींनी जे प्रयत्न केले. याबाबत बहूसंख्य प्रतिसादकांनी सारखीच उत्तरे दिली ती पुढीलप्रमाणे.
बापूजींनी शिक्षणाचे महत्व लोकांना पटवून दिले. लोकांचे सहकार्य मिळविण्या-साठी ते ठिकठिकाणी हिंडले. हायस्कूल व कॉलेज मान्यतेसाठी शासनाशी झगडले. लोकवर्गणीच्या मदतीतून त्यांनी ग्रामीण भागात वसतिगृहे काढली. प्रत्येक शाखेचा कारभार योग्य चालण्यासाठी गुणवान व कार्यक्षम लोकांच्या नेमणूका केल्या. संस्थेच्या कार्यक्षेत्राच्या विस्तारासाठी जनसंपर्क वाढविला. आदर्श निर्मितीसाठी शाळा, महाविद्यालयांना थोर पुरुषांची नांवे दिली. संस्थेची निष्ठेने कामे करणारे कार्यकर्ते तयार केले.
कॉलेज इमारती व इतर सोयी विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून निर्माण केल्या.
महाविद्यालयातून निरनिराळ्या योजना राबवील्या.
बहुजन समाजातील गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना आर्थिक सवलती देवून उच्च शिक्षण घेण्यास उत्तेजन दिले.

यावरुन बापूजींना विविध शैक्षणिक स्तराचा प्रसार करतांना शिक्षणाचे महत्व लोकांना पटवून द्यावे लागले. हायस्कूल व कॉलेज मान्यतेसाठी शासनाशी

झगडावे लागले असे दिसून येते. विविध शाळांच्या विकासासाठी लोक वर्गणी जमा करावीलागली ही बाब प्रकर्षाने जाणवते, तसेच हायस्कूल कॉलेजच्या इमारती बांधताना विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले. संस्थेच्या कार्यक्षेत्राचा विस्तार करण्यासाठी कार्यक्षम कार्यकर्ते तयार करावे लागले. निरनिराळ्या योजना राबवाव्या लागल्या. इत्यादी प्रयत्नामधून त्यांनी माध्यमिक, उच्च, तांत्रिक शिक्षण प्रशिक्षण या स्तरावर शिक्षण प्रसार घडवून आणला असे दिसते.

क] बापूजींचा स्त्री शिक्षणविषयक दृष्टिकोन व कार्य -

बापूजींचा स्त्री शिक्षणविषयी दृष्टिकोन -

स्त्री हा समाज सुधारणेचा मुलाधार आहे. प्रथम स्त्रीयांची सुधारणा झाली तर कुटुंबाची सुधारणा होईल. कुटुंब सुधारले तर समाज सुधारेल आणि पर्यायाने देशाची सुधारणा होईल. जिजाबाईने शिक्षण दिले म्हणून शिवाजी महाराज तयार झाले. त्यासाठी प्रथम गृहिणी सुसंस्कृत व सुशिक्षित झाली पाहिजे. असे बापूजींचे मत होते. त्यासाठी त्यांनी स्त्री शिक्षणास अधिक महत्त्व दिले.

बापूजींना जाणवलेल्या स्त्री शिक्षणविषयक समस्या -

स्त्री शिक्षणाचा प्रसार करताना बापूजीना कांही समस्या जाणावल्या.

१] मुलींच्या राहण्या जेवण्याची गैरसोय २] मुलींच्या स्वतंत्र शाळेची गैरसोय ३] मुलींना शिक्षण द्यावयाचे नाही. असा पालकांचा ~~पारंपारीक~~ दृष्टिकोन ४] पालकांची बिकट आर्थिक स्थिती इत्यादी समस्या सोडवण्यासाठी बापूजीनी स्त्री शिक्षण प्रसारावर जास्त भर दिला.

बापूजींचे स्त्री शिक्षणाचे कार्य -

१] बापूजीनी मुलीसाठी स्वतंत्र माध्यमिक शाळा काढल्या २] मुलीसाठी स्वतंत्र वसतिगृहे सुरु केली ३] महाराष्ट्रातील बहुजन समाजाला स्त्री शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. तसेच पालकांचे मुलींच्या शिक्षणाबाबतचे मत परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला.

४] मुलींच्या प्रशिक्षणाची सोय व्हावी म्हणून कराड येथे कमला नेहरु अध्यापक विद्यालय सन १९५५ मध्ये सुरु केले.

५] तासगांव येथे पदवीधर महिलासाठी स्वतंत्र शिक्षण महाविद्यालय सुरु केले.

६] विजया पाटील, यू. एच. खानापूरकर यांना प्राचार्य म्हणून काम करण्याची संधी दिली. श्रीमती एस्. व्ही. बोरगांवकर यांना मुख्याध्यापिका तर कांही स्त्रीयांना प्राध्यापिका, शिक्षिका म्हणून काम करण्याची संधी निर्माण करुन दिली. तसेच स्त्रीयांचा सामाजिक दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न केले. यावरुन बापूजींच्या स्त्री शिक्षणाविषयी केलेल्या कार्याची थोरवी समजून येते.

ड] <u>बापूजींचे सामाजिक एकता व जातीभेद निर्मूलनाबाबतचे कार्य.</u>

समाजात जातीभेद नसावा असे बापूजींचे मत होते. त्यासाठी त्यांनी कोणते प्रयत्न केले याबाबत मुलाखतीच्या वेळी प्रतिसादकांनी जी उत्तरे दिली त्याचे मुद्दे पुढीलप्रमाणे दिले आहेत.

१] बापूजीनी एकाच वसतिगृहात सर्व जातीच्या मुलाना प्रवेश दिला असे सर्व प्रतिसादकांनी [शेकडा १०० ] सांगितले.

२] संत गाडगेबाबांच्या अस्पृश्यता मोहिमेबरोबर बापूजी काही भागात हिंडले असे सर्व प्रतिसादकांनी [शेकडा १००] सांगितले.

३] बहुजन समाजाच्या शिक्षण प्रसारासाठी त्यांनी निस्वार्थी पणे धडपड केली. [असे शेकडा १०० प्रतिसादकांचे म्हणणे होते. ]

४] संस्थेत कर्मचारी भरती करताना कोणत्याही जातीच्या उमेदवारांना त्यांनी संधी दिली. [ असे शेकडा ९० प्रतिसादकांनी सांगितले. ]

५] निरनिराळ्या जातीच्या लोकांना बापूजीनी संस्थेचे आजीव सदसत्व दिले [असे शेकडा ८० प्रतिसादकांनी आपले मत व्यक्त केले. ]

६] त्याकाळी ब्राम्हणेत्तर जातीच्या लोकांना पूजाआर्चा करण्याचा अधिकार नव्हता त्यांनी स्वत: घरोघरी जावून पूजा अर्चा केल्या व अनिष्ठ प्रथा बंद करण्यासाठी प्रयत्न केले. [ असे शेकडा ६५ प्रतिसादकांनी सांगितले. ]

यावरून बापूजींनी अस्पृश्यता व जातीभेद निर्मूलनासाठी संस्थेत कर्मचारी भरती करताना, वसतिगृहात विद्यार्थ्यांना प्रवेश देताना, संस्थेचे आजीव सदस्य करताना जातीभेद मानला नाही. संत गाडगे बाबांच्या अस्पृश्यता निवारण कार्यात सक्रीय भाग घेतला. त्यांनी ब्राम्हणांच्या पूजा विधीची मक्तेदारी मोडली, हरिजन वस्तीत स्वच्छता सप्ताह या सारखे कार्यक्रम घडवून आणले असल्याचे दिसून येते.

इ) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले कार्य-

वसतिगृहातील मुलांचा आहार -

वसतिगृहातील मुलांचा आहार साधा व पौष्टीक असावा असे बापूजींचे मत होतें. [याबाबत मुलाखतीत शेकडा १०० प्रतिसादकांनी आपले मत व्यक्त केले.] वसतिगृहातील मुलांनी सदोदीत व्यायाम केला पाहिजे या गोष्टीवर बापूजींचा भर असे [ याबाबत शेकडा ६० प्रतिसादकांनी आपले मत व्यक्त केले. ]
"अंगात रग असेल तर, [उबदार पांघरूण] घेण्याची गरज नाही" असे प्राध्यापक घळके, शिक्षण महाविद्यालय उस्मानाबाद यांनी बापूजी म्हणत असलेले वाक्य सांगितले.

विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव.

विद्यार्थ्यामध्ये सभाधीटपणा येण्यासाठी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करून त्यामध्ये विद्यार्थ्यांना भाषणे करण्यास बापूजींनी चालना दिली. नेतृत्व गुणांची वाढ होण्यासाठी मुलांचे मंत्रीमंडळ तयार करून त्यांच्यावर जबाबदारीची कामे सोपविली. विद्यार्थ्यामध्ये श्रमाची आवड निर्माण व्हावी म्हणून संस्थेच्या शेतीवर विद्यार्थ्यांना कामे करण्यास दिली.
शिक्षणातून श्रम आणि ज्ञान यानी युक्त असा नागरीक घडवण्याचा प्रयत्न केला. असे बहुसंख्य प्रतिसादकांनी सांगितले.

ई ] शिक्षण संस्थेचे ध्येय -

" ज्ञान विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार " या ध्येय वाक्याचा बापूजींनी स्विकार केला.

या ध्येय वाक्याचा का स्विकार केला या विषयी बहुसंख्य[शेकडा ८०]प्रतिसादकांनी आपली मते खालील प्रमाणे दिली आहेत.

माणसाने सुसंस्कारी होण्यासाठी शिक्षण प्रसाराची आवश्यकता बापूजींनी प्रतिपादन केली. 'सुसंस्कार चांगल्या गोष्टीचे ज्ञान प्राप्त केल्यानेच होतील' असे बापूजी नेहमी म्हणत असत.

त्यांनी भगवत गीतेतील विज्ञान शब्दाचा अर्थ "आचार" असा घेतला आहे.

ज्ञान म्हणजे सत्य, प्रेम, चारित्र्य, प्रामाणिकपणा, सेवा आणि त्याग यांचे ज्ञान व विज्ञान म्हणजे या तत्वाचे आचरण.
वरील तत्वाचे आचरण केल्याने मनुष्य सुसंस्कारी होईल. सुसंस्कारी मनुष्यच परमेश्वराचा अविष्कार आहे. हा अर्थ बापूजींना अभिप्रेत होता.

४.४ **शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांनी स्थापन केलेल्या विविध शाखाना भेटी देवून मिळविलेल्या माहितीचे पृथक्करण व अर्थनिर्वचन.**

शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांनी "श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची सन १९५४ मध्ये स्थापना केली. या संस्थेच्या शाखा जून १९५५ पासून सुरु झाल्या. सद्या या संस्थेच्या एकूण २६० शाखांचा विस्तार महाराष्ट्र राज्यातील १० जिल्हयात झाला आहे. त्यापैकी प्रत्येक जिल्हयातील कांही माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालये, अध्यापक विद्यालये व शिक्षण महाविद्यालये यांना संशोधकाने भेटी दिल्या.

अ] **बापूजी साळुंखे यांनी स्थापन केलेली कांही माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालये.**

बापूजी साळुंखे यांनी ज्या भागात माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाची सोय नाही अशा भागात माध्यमिक शिक्षणाचा प्रसार सुरु केला. त्यांनी सुरु केलेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांची प्रगती जाणून घेण्यासाठी त्यांनी स्थापन केलेल्या कांही माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांना अभ्यासकाने भेटी दिल्या. बापूजींनी महाराष्ट्रातील १० जिल्हयात एकंदर १४५ माध्यमिक व ३० उच्च माध्यमिक विद्यालये सुरु केली. [बापूजींनी स्थापन केलेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची तालुकावार, जिल्हावार यादी परिशिष्ट ६ मध्ये दिली आहे.] अभ्यासकाने त्यापैकी कांही जिल्हयातील माध्यमिक विद्यालये व उच्च माध्यमिक विद्यालयांना भेटी देवून मिळविलेली माहिती पुढीलप्रमाणे दिली आहे.

१] **बापूजी साळुंखे यांनी स्थापन केलेली कांही विद्यालये.**

क] **राजर्षी छत्रपती शाहू महाराज हायस्कूल, कोल्हापूर जि. कोल्हापूर.**

जुन्या बुधवार पेठेतील भुसारवाडयात बापूजींनी सर्व प्रथम

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

सन १९५५ मध्ये हे हायस्कूल सुरु केले. या हायस्कूलचे उद्घाटन श्री. जे. पी. नाईक यांच्या हस्ते झाले. बापूजीची जेष्ठ कन्या अरुणा ही त्या हायस्कूलल मध्ये प्रवेश घेणारी सर्व प्रथम विद्यार्थीनी होती. या हायस्कूलचे मुख्याध्यापक म्हणून सुरवातीस बापूजीनी काम पाहिले. बापूजी स्वत: हाडाचे शिक्षक असल्याने विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त विकास घडवून आणला. व दरवर्षी निकाल चांगला लागत असल्यामुळे या हायस्कूलची संख्या वाढू लागली. त्यावेळचे नगराध्यक्ष दादासाहेब हळदकर व नगरपालिका सदस्य श्री. एस. डी. वायचळ यांनी हायस्कूलसाठी जागा उपलब्ध करुन दिली. या हायस्कूलचे बांधकाम चालू असतांना इमारतीसाठी खोदलेल्या १६ फूट खोल खड्डयात बापूजी पडले. त्यावेळी ते तीन महिने छत्रपती प्रमिला राजे या दवाखान्यात पडून होते. सद्या या हायस्कूलचे मुख्याध्यापक म्हणून श्री. बी. एस. मोहिते हे काम पाहतात. त्यांच्या कुशल सेवाभावी वृत्तीने या हायस्कूलचा विकास घडून आला.

या हायस्कूलची गुणवत्ता -

श्री. आबासाहेब कांबळे हे या विद्यालयातील हरिजन विद्यार्थी एम. बी. बी. एस. झाले. या हायस्कूलचा दरवर्षी सरासरी शेकडा ८० निकाल लागतो. सन १९८५ मध्ये "मुलगी झाली हो" हे नाटय या हायस्कूल तर्फे सांगली आकाशवाणी वरुन प्रसारित केले. महाराष्ट्र शासनाचे त्याला तृतीय पारितोषीक मिळाले.

या हायस्कूलमधील उपक्रम -

" हरिजन सप्ताह " या कार्यक्रमामध्ये या विद्यालयातील विद्यार्थी शहारातील हरिजन वस्तीमध्ये जावून स्वच्छता करतात. वृक्षारोपण, सहभोजन, विज्ञान प्रदर्शन, रक्षाबंधन इत्यादी कार्यक्रम या विद्यालयात आयोजित केले, जातात.

ख) कुर्मदास विद्यामंदिर, लऊळ, ता. माढा जि. सोलापूर.

ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने सन १९६०

मध्ये हे हायस्कूल सुरु केले. सुरवातीस हे हायस्कूल भाड्याच्या इमारतीत चालू होते. येथील श्रीमती पार्वतीबाई खुने यानी हायस्कूल साठी एक हेक्टर जमीन दिली. या हायस्कूलच्या विकासासाठी श्री. विश्वास मुरलीधर पाटील यांनी खूप परिश्रम घेतले. सन १९७७ ते १९८४ पर्यंत माननीय मुख्याध्यापक श्री. एन्.आर. बदडे यानी या हायस्कूलची सर्वांगीण प्रगती घडवून आणली. तसेच एस्.एस्.सी. परीक्षेच्या निकालाची उज्वल परंपरा राखली. सद्या श्री. मोकाशी हे मुख्याध्यापक म्हणून काम पाहतात त्यांच्या प्रयत्नांने हायस्कूलच्या इमारतीचे बांधकाम सन १९८५ मध्ये पूर्ण झाले. सन १९८५ मध्ये या हायस्कूलचा रौप्य महोत्सव साजरा झाला.

या हायस्कूलची गुणवत्ता :

श्री. कल्याण शिवलिंग शहाणे हा या हायस्कूलचा विद्यार्थी एस.एस.सी. परीक्षेत पुणे बोर्डात सन १९८३ मध्ये ११ वा आला. दरवर्षी या हायस्कूलचा सरासरी शेकडा ९० टक्के निकाल लागतो. प्रभाकर शहाणे हा सन १९८४ मध्ये जिल्हयात जिल्हापातळीवरील वक्तृत्व स्पर्धेत तिसरा आला.

या हायस्कूलमधील उपक्रम -

रेल्वे स्टेशनच्या रस्त्याची दुरुस्ती विद्यार्थ्यांनी सामुदायीक श्रमदानाने केली. वृक्षारोपण, रक्षाबंधन, सहभोजन, वक्तृत्व स्पर्धा या सारखे उपक्रम आयोजित केले जातात या विद्यालयातर्फे साक्षरता वर्ग चालविले जातात.

ग] बीड हायस्कूल , बीड - [जि. बीड]

बीड या जिल्हयाच्या ठिकाणी दुस-या संस्थेचे एकच हायस्कूल होते. माध्यमिक शिक्षणाची वाढती गरज यामुळे येथील श्री. कोल्हे

वकील यांच्या सहकार्याने या हायस्कूलची सन १९६५ मध्ये सुरुवात केली. सुरवातीस या ठिकाणी चार वर्ग होते. विद्यार्थी संख्या ५८ होती. सद्या या हायस्कूलची स्वतंत्र इमारत आहे. तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना राहाण्यासाठी सन १९७५ पर्यंत वसतिगृहाची सोय होती. परंतु सद्या येथे वसतीगृहाची सोय नाही. सद्या श्री. एफ्. एच्. इनामदार हे मुख्याध्यापक म्हणून या हायस्कूलचे काम पाहतात. हायस्कूलसाठी क्रिडांगण व भरपूर क्रीडा साहित्याची सोय आहे.

या हायस्कूलची गुणवत्ता - सन १९८१ मध्ये श्री. सुभाष शेंडे या विद्यार्थ्याने एस्. एस्. सी. परीक्षेत औरंगाबाद बोर्डात १९ वा क्रमांक मिळवला. दरवर्षी या हायस्कूलचा सरासरी शेकडा ७५ निकाल लागतो. जिल्हा पातळीवर होणा-या धावणे [४०० मीटर] स्पर्धेत सन १९८४ मध्ये श्री. यु. बी. डावकरे पहिला आला. सन १९८५ मध्ये श्री. नवगिरे ए. जी. याने समरगीत स्पर्धेत जिल्हा पातळीवर २ रा क्रमांक मिळविला.

या हायस्कूलमधील उपक्रम :-

या विद्यालयातर्फे साक्षरता वर्ग घेतले जातात. वृक्षारोपण, सहभोजन, विज्ञान प्रदर्शन, वक्तृत्व स्पर्धा, रक्षाबंधन यासारख्या सहशालेय कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

घ] डॉ. विश्राम रामजी घोले हायस्कूल वाकवली [ता. दापोली जि. रत्नागिरी]

रत्नागिरी जिल्हयातील संस्थेचे हे तिस-या क्रमांकाचे हायस्कूल आहे. याची स्थापना १९६७ मध्ये झाली. डॉ. विश्राम घोले यानी हायस्कूल साठी ५० हजाराची उदार देणगी दिली. श्री. वाय. बी. चौगुले या मुख्याध्यापकाने या हायस्कूलचा विकास घडवून आणला. सुरुवातीस या विद्यालयाचे चार वर्ग होते व ३५ विद्यार्थी संख्या होती. सद्या या हायस्कूलची स्वतंत्र इमारत आहे. या विद्यालयाची ५०० विद्यार्थी संख्या आहे. श्री. बी. डी. देशमुख मुख्याध्यापक म्हणून काम पाहातात.

या हायस्कूलची गुणवत्ता -

सन १९८० मध्ये या विद्यालयातील श्री. जे.टी. कोरबू याना आदर्श शिक्षक म्हणून जिल्हा पुरस्कार मिळाला.
सन १९८२ मध्ये श्री. मगेश जाधव याने बालचित्रकला स्पर्धेत जिल्हा पातळीवर दुसरा क्रमांक मिळविला. श्री. पी.एस. खोते याने एस्.एस्. सी. परीक्षेत सन १९८४ मध्ये ८०% गुण मिळविले. कु.एस.ए. करंदीकर हिने एस्.एस्.सी. परीक्षेत सन १९८५ मध्ये ७५% गुण मिळविले.

या हायस्कूलमधील उपक्रम -

वृक्षारोपण कार्यक्रमामध्ये १०० हापूस आंब्याच्या झाडाची लागण केली. सन १९८४ मध्ये या हायस्कूलने रोपवाटीका केंद्र चालविले. सन १९८५ पासून येथील विद्यार्थी सहकारी ग्राहकभांडार चालवतात. रक्षाबंधन, सहभोजन, वक्तृत्वस्पर्धा, इत्यादी उपक्रम येथे केले जातात.

च] पोष्ट बेसिक माध्यमिक विद्यालय, आशागड [ जि. ठाणे ]

आशागड हा ठाणे जिल्हयातील अतिशय मागासलेला भाग असून तेथे आदिवासी वस्ती आहे. वारली, कातकरी जमातीचे बहुसंख्य लोक येथे राहातात. या आदिवासी लोकांच्यामध्ये शिक्षणाचे प्रमाण अजिबातच नसल्याने बापूजीनी या मागासलेल्या जमातीमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्याचे उद्देशाने सन १९६५ मध्ये या ठिकाणी इयत्ता पहिलीचा वर्ग सुरू केला. त्यानंतर दरवर्षी एका नवीन वर्गाची वाढ होत गेली. सुरुवातीस या शाळेस शासनाचे अनुदान नव्हते. सन १९७४ पासून ८ वी च्या वर्गास सुरवात झाली. त्या वर्षापासून श्री. बी. बी. कुपवाडे हे मुख्याध्यापक म्हणून काम पाहात होते. त्यानंतर श्री. आर. बी. बप्प, श्री. बी. डी. पाटील हे मुख्याध्यापक लाभले. श्री. पी. एस्. पारेख या सामाजिक कार्यकर्त्याच्या सहकार्याने या विद्यालयाचा विकास झाला.

या विद्यालयास स्वत:च्या मालकीची १५ एकर जमीन आहे. त्यापैकी ८ एकर जमीन विद्यार्थ्यांच्या श्रमदानाने उपजाऊ केली आहे. येथील विद्यार्थ्यांना व शिक्षकांना वसतिगृहातच रहावे लागते. विद्यार्थ्यांना सकाळी ७ ते ९ पर्यंत संस्थेच्या शेतावरील कामे करावी लागतात. शेतीमधून मिळणा-या उत्पन्नामधून वसतिगृहाचा खर्च भागविला जातो. सध्या या ठिकाणी १० वी पर्यंत फक्त आदिवासी लोकांच्या मुलांची शिक्षणाची सोय आहे. श्री. आर. डी. मोहिते मुख्याध्यापकाचे काम पाहातात.

या हायस्कूलची गुणवत्ता -

येथे फक्त आदिवाशी जमातीची मुले शिक्षण घेत असल्यामुळे त्यांच्यामध्ये शिक्षणाचा दृष्टीकोण फारच कमी आहे. तरी सुध्दा येथील विद्यार्थी इतर आदिवासी शाळेपेक्षा जास्त गुण मिळवतात. बाळ्या भोईर नावाच्या या शाळेच्या हुशार विद्यार्थ्याने एम. बी. बी. एस्. पर्यंतचे शिक्षण घेतले.

या हायस्कूल मधील उपक्रम -

या हायस्कूलमधील विद्यार्थ्यांचा संपूर्ण वेळ वसतिगृहातच जात असल्याने सामुदायिकरित्या ते निरनिराळ्या उपक्रमात भाग घेतात. उदा. वृक्षारोपण सहभोजन , श्रमदान, रक्तदान, रक्षाबंधन, सन १९८५ मध्ये बालक मेळावा आयोजित केला होता. त्यात ७० विद्यार्थ्यांना मोफत कपडे वाटले.

२] बापूजींनी स्थापन केलेली कांही उच्च माध्यमिक विद्यालये-

अ] न्यू उच्च माध्यमिक इंग्लिश स्कूल , जोहे [ जि. रायगड]
[ स्थापना १९७६ ]

रायगड जिल्हयातील जोहे या गांवी बापूजींनी सन १९६१ मध्ये "न्यू इंग्लिश स्कूल" या माध्यमिक विद्यालयाची स्थापना केली. हे गांव अतिशय दुर्गम अशा भागात असून या अविकसीत ठिकाणी बापूजींनी स्वत:

लक्ष्य घालून या हायस्कूलचा विकास घडवून आणला शासनाच्या [१०+२+३] या नवीन शैक्षणिक आकृतीबंधानुसार या हायस्कूलला जोडून सन १९७६ मध्ये ११ वी कला आणि वाणिज्यशाखेचे दोन वर्ग सुरु झाले. सुरवातीच्या या वर्गातील विद्यार्थी संख्या ११० होती. सन १९७७ मध्ये दोन्ही शाखेचे १२ वी चे वर्ग सुरु झाले. त्यामुळे संख्येत अधिक वाढ झाली. श्री. बी. बी. अपराध हे या उच्च माध्यमिक विद्यालयाचे पहिले मुख्याध्यापक होते. त्यानी या विद्यालयाचा सतत ४ वर्ष परिश्रम घेवून विकास घडवून आणला. सद्या या विद्यालयाचे प्राचार्य म्हणून श्री. डी. डी. पाटील हे काम पाहातात. याउच्च माध्यमिक विद्यालयाने उज्वल यशाची परंपरा टिकविल्याने विद्यार्थी संख्येत सतत वाढ होत गेली. सद्या येथील चार वर्गाची विद्यार्थी संख्या २८६ आहे. या विद्यालयाला स्वतंत्र इमारत नसल्याने न्यू इंग्लिश स्कूलच्या इमारतीतच वर्ग चालतात. माजी मुख्यमंत्री शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या उपस्थितीमध्ये सन १९८६ मध्ये या शाळेचा रौप्य महोत्सव साजरा झाला.

## या उच्च माध्यमिक विद्यालयाची गुणवत्ता :-

मुख्याध्यापक श्री. बी. बी. अपराध यांना सन १९७७ मध्ये राज्य पुरस्कार मिळाला. श्री. आर. जे. पाटील हा विद्यार्थी सन १९८५ च्या उच्च माध्यमिक शालांत परिक्षेत शेकडा ८८ गुण मिळवून जिल्हयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला. या उच्च माध्यमिक विद्यालयाचा दरवर्षीचा सरासरी शेकडा निकाल ९० लागतो. श्री. शशीकांत पवार यास जिल्हा पातळीवर सन १९८६ मध्ये चित्रकला स्पर्धेत दुसरा क्रमांक मिळाला.

## या उच्च माध्यमिक विद्यालयातील उपक्रम -

" एक मूल एक झाड " या योजनेखाली वृक्षारोपण व झाडाचे विद्यार्थी संरक्षण करतात. १२ वी कला शाखेचे विद्यार्थी साक्षरता वर्ग चालवतात. चर्चा सत्रे आयोजित केली जातात. दर वर्षी बापूजी साळुंखे वक्तृत्व स्पर्धा घेतली जाते.

ख] स्वामी रामानंद उच्च माध्यमिक विद्यालय, तासगांव [जि. सांगली]

तासगांव येथे प्रथम बापूजींनी सन १९५५ मध्ये माध्यमिक विद्यालय सुरु केले. स्वामी रामानंद भारती यांनी या हायस्कूल स्थापनेस खूप सहकार्य केले. त्यांनी बापूजीना वेळोवेळी माध्यमिक शिक्षणाचा प्रसार करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन केले. शासनाच्या [१०-२-३] या नवीन शैक्षणिक आकृतीबंधानुसार या हायस्कूलला जोडून सन १९७६ मध्ये ११ वी कला आणि वाणिज्य शाखेचे वर्ग सुरु झाले श्री. डी. आर. माने हे या विद्यालयाचे पहिले मुख्याध्यापक होते. या विद्यालयाचा १९८० मध्ये रौप्यमोहोत्सव साजरा झाला. सद्या या उच्च माध्यमिक विद्यालयाचे श्री. व्ही. एन. पाटील हे मुख्याध्यापक म्हणून काम पाहातात. ११ वी १२ वी च्या चार वर्गाची संख्या सद्या ५४९ आहे.

या उच्च माध्यमिक विद्यालयाची गुणवत्ता -

मुख्याध्यापक श्री. व्ही. एन. पाटील याना सन १९८३ मध्ये आदर्श शिक्षक म्हणून राज्य पुरस्कार मिळाला. बापूजी साळुंखे वक्तृत्व स्पर्धेत कु. तनुजा रामपूरे हिला राज्य पातळीवर सन १९८४ मध्ये प्रथम क्रमांक मिळाला. सन १९८४ मध्ये या उच्च माध्यमिक शालांत परिक्षेचा शेकडा ८६ निकाल लागला. प्राध्यापक आचार्य यांच्या "इयत्ता ११ वी साठी अर्थशास्त्र " या क्रमिक पुस्तकास पाठयपुस्तक मंडळाची सन १९८५ मध्ये मंजूरी मिळाली.

या माध्यमिक विद्यालयातील उपक्रम -

या विद्यालयातील विद्यार्थी चिंचणी या गांवी साक्षरता वर्ग चालवतात " एक मुल एक झाड " या योजनेखाली वृक्षारोपण व झाडाचे संरक्षण करतात. सन १९८६ मध्ये चर्चा सत्र आयोजित केले होते. रक्तदान, सामुदायिक श्रमदान, रक्षाबंधन, वक्तृत्व स्पर्धा इत्यादी कार्यक्रम या विद्यालयात आयोजित केले जातात.

ब] बापूजी साळुंखे यांनी स्थापन केलेली कांही तंत्र विद्यालये.

बापूजी साळुंखे यांनी आधुनिक युगातील तंत्र शिक्षणाचे महत्व लक्ष्यात घेवून कांही तंत्र विद्यालये काढली. या विद्यालयाची प्रगती जाणून घेण्यासाठी अभ्यासकाने कांही तंत्र विद्यालयाना भेटी दिल्या. बापूजींनी तंत्र शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून ५ तंत्र विद्यालये व पाटण, येथे एक पॉलिटेक्निक काढले.

[ तंत्र विद्यालयाची यादी परिशिष्ट क्रमांक ६ मध्ये दिली आहे. ]
अभ्यासकाने त्यापैकी जयहिंद तंत्र विद्यालय, लोणी काळभोर या ठिकाणी भेट देवून मिळवलेली माहिती पुढीलप्रमाणे दिली आहे.

बापूजी साळुंखे यांनी स्थापन केलेले
जयहिंद टेक्निकल हायस्कूल, लोणी काळभोर [ जि. पुणे. ]

लोणी काळभोर येथील विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षणासाठी पुण्यास जावे लागे, सन १९६० मध्ये येथे माध्यमिक शिक्षणासाठी एक ही हायस्कूल नसल्याचे बापूजींच्या लक्ष्यात आले. येथील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गैरसोय दूर व्हावी म्हणून सन १९६० मध्ये हे हायस्कूल सुरु केले. श्री. आर. आर. काकडे हे विद्यालयाचे पहिले मुख्याध्यापक झाले. शासनाच्या तंत्रशिक्षण धोरणास चालना मिळावी म्हणून सन १९७५ मध्ये जयहिंद हायस्कूल मध्ये इयत्ता ८ या वर्गापासून टेक्निकल शाखा सुरु झाली. सुरवातीस सन १९७५ मध्ये टेक्निकल च्या वर्गात २८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. सद्या या ठिकाणी १० वी पर्यन्त टेक्निकल विषय घेण्याची सोय आहे. लोहारकाम, सुतारकाम, जोडारी , वायरमन इ. तांत्रिक विषयातील कौशल्याचे ज्ञान दिले जाते. येथील टेक्निकलचे वर्ग जयहिंद हायस्कूलच्या इमारतीत चालतात. प्रत्येक टेक्निकल विषया-साठी स्वतंत्र वर्कशॉपची सोय आहे. सद्या या टेक्निकल हायस्कूलचे श्री. आर. ए. सुलगेकर हे मुख्याध्यापक म्हणून काम पाहातात.

या विद्यालयाच्या विकासासाठी सन १९७५ मध्ये ग्रामस्थानी ५० हजार रुपयांचे सहाय्य केले. तसेच प्रसिध्द अभिनेता राजकपूर यानी या हायस्कूलसाठी ३ हेक्टर जमीन दिली. सन १९८४ मध्ये या विद्यालयाच्या नवीन दोन मजली इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले.

## या टेक्निकल हायस्कूलची गुणवत्ता :-

सन १९८४ मध्ये हरियाना येथे झालेल्या कबड्डी सामन्यात कु. वंदना काळभोर याना राष्ट्रीय क्रीडा पारितोषिक व शिष्यवृत्ती मिळाली. सौ. पी.आर.सुळेकर, सौ. एन्.एन्.लाटकर यांनी पुणे जिल्हा विस्तारसेवा योजनेमध्ये सन १९८४ मध्ये भाग घेतला. सन १९८५ मध्ये श्री. पी.व्ही. काळभोर याने एस्.एस्.सी. टेक्निकल परीक्षेत शेकडा ८५ गुण मिळविले. व जिल्हयात द्वितीय क्रमांक मिळविला.

## या विद्यालयातील उपक्रम -

विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या तांत्रिक साहित्याचे दरवर्षी प्रदर्शन भरवतात. सामुदायिक श्रमदान, रक्षाबंधन, वृक्षारोपण या सारखे कार्यक्रम घेतात.

क] बापूजी साळुंखे यांनी स्थापन केलेली कांही महाविद्यालये-

बापूजीनी सुरू केलेल्या महाविद्यालयाची प्रगती जाणून घेण्यासाठी त्यांनी स्थापन केलेल्या कांही महाविद्यालयांना अभ्यासकाने भेटी दिल्या. बापूजीनी महाराष्ट्रातील ६ जिल्ह्यामध्ये एकंदर १६ महाविद्यालये काढली. त्याची जिल्हावार यादी [ परिशिष्ट क्रमांक ६] मध्ये दिली आहे.

अभ्यासकाने त्यापैकी कांही महाविद्यालयांना भेटी देवून मिळविलेली माहिती पुढीलप्रमाणे दिली आहे.


१] आर्टस, सायन्स, ॲण्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी [जि. कोल्हापूर]

महाराष्ट्रातील इचलकरंजी सारख्या औद्योगिक शहरात सन १९६२ मध्ये या महाविद्यालयाची सुरवात झाली. बापूजीनी तेथील शिक्षणप्रेमी लोकांच्या भेटी घेवून आमदार दत्ताजी कदम, श्री. पी. टी. कणसे, श्री. बाळासाहेब वडिगे, श्री. धनपाल खोत, आमदार श्री. आवाडे इत्यादी व्यक्तीकडून आर्थिक सहकार्य मिळविले. संस्थेच्या "न्यू इंग्लिश स्कूल" या हायस्कूलच्या इमारतीत प्रथम हे महाविद्यालय भरत होते. सुरवातीस प्राचार्य डॉ. डी. एन्. सोळंकी यांनी या महाविद्यालयाचा विकास घडवून आणला. येथील नगर पालिकेने दर वर्षी ७१ हजार रुपये या प्रमाणे सन १९६३ पासून सतत चार वर्षे आर्थिक साहय्य केले. बापूजींच्या संस्कार क्षम कार्यपध्दतीमुळे व येथील अनुभवी प्राध्यापक वर्गाच्या सहभागामुळे महाविद्यालयाची सतत प्रगती होत गेली. सन १९७६ मध्ये पदव्युत्तर अध्यापन केंद्र सुरू झाले. महाविद्यालयाच्या ग्रंथालय इमारतीसाठी विद्यापीठ अनुदान मंडळाने सन १९८४ मध्ये दीड लाख रुपयांचे अनुदान दिले.

आकृती क्र. १

आर्टस्, सायन्स अण्ड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी या महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या दर्शविणारा

( कोष्टक क्रमांक- ४.१८)



यां महाविद्यालयाच्या विद्यार्थी संख्येची प्रगती.

कोष्टक क्र. ४. १८

| अ. नं. | शैक्षणिक वर्ष | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १. | १९६८–६९ | ६०० |
| २. | १९७०–७१ | ८५० |
| ३. | १९७२–७३ | ९४० |
| ४. | १९७४–७५ | १०६० |
| ५. | १९७६–७७ | १२१० |
| ६. | १९७८–७९ | १२७० |
| ७. | १९८०–८१ | १३५० |
| ८. | १९८२–८३ | १४४० |
| ९. | १९८४–८५ | १५९० |
| १०. | १९८६–८७ | १७७० |

कोष्टक क्र. ४. १८ वरून लक्षात येते की, दरवर्षी विद्यार्थी संख्या सतत वाढत असून सन १९८६–८७ मध्ये महाविद्यालयाची संख्या खूपच वाढली आहे.

महाविद्यालयाची गुणवत्ता –

सन १९८४ मध्ये श्री. विजय केटकाळे यांची दिल्ली येथे प्रजासत्ताक दिन परेडसाठी निवड झाली. श्री. भोसले एस्. आर. आणि श्री. विजय पाटील यांची सन १९८६ मध्ये आर्मी अॅटॅचमेंट कॅंपसाठी निवड झाली. श्री. कोरवी व्ही. एस्. यांची सन १९८६ मध्ये पुणे येथे शिवाजी ट्रीफ कॅंपसाठी निवड झाली.

सन १९८५ मध्ये प्राध्यापक स्वामी [रसायन शास्त्र], प्राध्यापक आवटी [प्राणीशास्त्र] यांनी पी.एच्.डी.पदवी मिळविली.
प्राध्यापक गजानन सुर्वे यांची केंद्र सरकारच्या नवीन शैक्षणिक धोरण सूचनेसाठी प्रतिनिधी म्हणून निवड झाली. प्राध्यापक व्ही.जी. सूर्यवंशी यांची उच्च माध्यमिक शिक्षण मंडळावर पाठ्यपुस्तक परिक्षणासाठी नियुक्ती झाली.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे क्रीडा क्षेत्रातील नैपुण्य -

श्री. राजेंद्र ठोंबरे यांची मद्रास येथे अखिल भारतीय आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धेसाठी सन १९८४ मध्ये शिवाजी विद्यापीठातर्फे निवड झाली. सन १९८५ मध्ये कु. छाया सुलतानपुरे हिने महाराष्ट्र राज्य हिवाळी स्पर्धेत लांब उडीमध्ये प्रथम क्रमांक मिळविला.

महाविद्यालयातील उपक्रम -


पंढरपूरे यंत्रमाग धारकांच्या प्रश्नाचे सर्वेक्षण करण्याचा उपक्रम कॉलेजने हाती घेतला आहे. विद्यार्थी कल्याण मंडळातर्फे गरीब होतकरू विद्यार्थ्यांना सन १९८४-८५ मध्ये ७८०० रुपये वाटण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे वृक्षारोपण, रक्तदान, खेडेदत्तक योजना, यासारखे उपक्रम घेतले जातात. बापूजीसाळुंखे वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली जाते. "कमवा आणि शिका" या योजनेतून विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील कामे दिली जातात.

२] आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, मिरज [जि. सांगली]

मिरज मधील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी सांगली येथे जावे लागे. ही शैक्षणिक गैरसोय बापूजींना जाणवली आणि मिरज नगरपालिकेच्या सहकार्याने सन १९६५ पासून कला आणि वाणिज्य शाखा सुरु केल्या. संस्थेने पंढरपूर रस्त्यावर ७ एकर जागा खरेदी केली. १ लाख रुपये खर्च करून तीन महिन्यात महाविद्यालयाची इमारत उभी केली.

आकृती क्रं 2

आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज मिरज या महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या दर्शविणारा आलेख.



मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे हस्ते या इमारतीचे उद्घाटन झाले. त्याप्रसंगी आप्पासाहेब मराठे यांनी ५००० रू. देणगी दिली. वसंत दादा पाटील यांनी माधवनगर साखर कारखान्याकडून दहा हजार रूपयाचे सहाय्य केले. श्री. एस्. बी. चव्हाण हे या कॉलेजचे पहिले प्राचार्य झाले. प्राचार्य राणे यांच्या कारकीर्दीत १९७४ पासून शास्त्र शाखा सुरु झाली. त्यानंतर प्राचार्य डी. ए. पाटील व सौ. विजया पाटील यानी या महाविद्यालयाचा विकास घडवून आणला. हे कॉलेज प्रशस्त क्रिडांगण, उत्कृष्ट ग्रंथालय, सुसज्ज प्रयोग शाळा व वसतिगृह इत्यादी सोयीनी परिपूर्ण आहे. मिरजेचे शिल्पकार विजय गुजर यांच्या सहकार्याने स्वामी विवेकानंदाचा पुतळा महाविद्यालयाच्या आवारात उभारला आहे.

## या महाविद्यालयाच्या विद्यार्थी संख्येची प्रगती.

कोष्टक क्र. ४. १९

| अ. नं. | शैक्षणिक वर्ष | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १. | १९६८-६९ | ४५० |
| २. | १९७०-७१ | ६७० |
| ३. | १९७२-७३ | ७९० |
| ४. | १९७४-७५ | ९२० |
| ५. | १९७६-७७ | १००० |
| ६. | १९७८-७९ | ११०० |
| ७. | १९८०-८१ | १३७५ |
| ८. | १९८२-८३ | १५०० |
| ९. | १९८४-८५ | १८०० |
| १०. | १९८६-८७ | १९५० |

कोष्टक क्रमांक ४. १९ वरून लक्षात येते की, सन १९७० ते १९७९

पर्यंत साधारणपणे १०० च्या टप्प्याने विद्यार्थी संख्या वाढत गेली. सन १९८८-८९ मध्ये विद्यार्थी संख्या २२०० झाली असे दिसून येते.

<u>या महाविद्यालयाची गुणवत्ता -</u>

प्राध्यापक पी.एस्. मोहिते यांचे विज्ञान विषयावरील तीन शोध निबंध केट युनिव्हर सिटी [अमेरिका] येथे स्विकृत झाले. प्राध्यापक एच्.आर. झंवर यांची जेरु सलेम आंतरराष्ट्रीय परिषदटोकिओ येथे बॉटनिकल सेमिनारसाठी निवड झाली. प्राध्यापक के.अे.मोकाशी यांच्या स्वप्नाचे अश्रू या नाटकाला महाराष्ट्र शासनाचे प्रकाशन अनुदान मिळाले. या महाविद्यालयाने विद्यापीठ परीक्षा निकालाची उज्वल परंपरा राखली आहे.

<u>महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे क्रीडा क्षेत्रातील नैपुण्य -</u>


सन १९८५ मध्ये श्री. पिरजादे यांची शिवाजी विद्यापीठाच्या फूटबॉल संघात कॅप्टन म्हणून निवड झाली. श्री.मोहन पाटील यांची शिवाजी विद्यापीठाच्या बास्केट बॉल संघात निवड झाली.

<u>या महाविद्यालयातील उपक्रम -</u>

राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे वृक्षारोपण, प्रौढ साक्षरता सारखे कार्यक्रम घेतले जातात. 'सावली'हे खेडे दत्तक घेतले आहे. निरनिराळ्या वक्तृत्व स्पर्धा आयोजित केल्या जातात. "कमवा व शिका" योजनेचा गरीब विद्यार्थ्यांना लाभ होतो.

३] <u>श्री तुळजाभवानी महाविद्यालय, तुळजापूर</u> [जि.उस्मानाबाद.]

तुळजापूर या तालुक्याच्या ठिकाणी महाविद्यालय असावे अशी तुळजापूर येथील शिक्षण प्रेमी नागरीकांची इच्छा होती. त्याप्रमाणे १९६४ मध्ये कॉलेज सुरु करण्याचा प्रयत्न बापूजींनी केला. परंतु कांही अडचणीमुळे कॉलेज सुरु झाले नाही. येथील संस्थेचे उपाध्यक्ष श्री.साहेबराव हंगरगेकर ,


आकृती क्रमांक-3
श्री तुळजाभवानी महाविद्यालय, तुळजापूर या महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या
दर्शविणारा आलेख.
(कोष्टक क्रमांक 4.20)
प्रमाण
1400
1300
1200
1100
1000
900
800
700
600
500
400
300
200
100
विद्यार्थी संख्या
वर्ष →

श्री. बापूसाहेब पाटील, श्री. माणिकराव खपले, श्री. आबासाहेब साळुंखे श्री. पांडू नाईक इ. शिक्षणप्रेमी व्यक्तींनी नागरीकाकडून देणगी रुपाने वीस हजार रुपये जमा केले व संस्थेने चाळीस हजार रुपये देवून २ जून १९७१ पासून हे कॉलेज सुरु झाले. के. एस्. नाईक हे या कॉलेजला पहिले प्राचार्य लाभले. सोलापूर रोडवर पापनासी तीर्थशिजारी हे कॉलेज वसले आहे. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या कारकीर्दीत महाविद्यालय, परिसरात उत्कृष्ट बगीचा व स्वामी विवेकानंदाचा पुतळा बसविण्यात आला. त्यानंतर प्राचार्य रविंद्र चव्हाण व प्राचार्य पी. बी. चव्हाण यांनी महाविद्यालयाचा विकास घडवून आणला. सधा महाविद्यालयास स्वतंत्र इमारत असून वसतिगृहाची सोय आहे. कॉलेज आवारातच प्राचार्यांचे स्वतंत्र निवासस्थान आहे.

या महाविद्यालयात कला, वाणिज्य या विद्या शाखांची सोय आहे. तसेच पदव्युत्तर राज्यशास्त्र व एम. कॉम. शिकवण्याची सोय आहे.

या महाविद्यालयाच्या विद्यार्थी संख्येची प्रगती.

कोष्टक क्र. ४. २०

| अ. नं. | शैक्षणिक वर्ष | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १. | १९७२-७३ | १५० |
| २. | १९७४-७५ | ३१० |
| ३. | १९७६-७७ | ३९० |
| ४. | १९७८-७९ | ५३५ |
| ५. | १९८०-८१ | ७०० |
| ६. | १९८२-८३ | ९५० |
| ७. | १९८४-८५ | ११५० |
| ८. | १९८६-८७ | १३८० |

या [४. २०] कोष्टकावरुन सन १९८४ पासून विद्यार्थी संख्या खूप

वेगाने वाढत आहे. या वर्षी विद्यार्थी संख्या १५०० असल्याचे दिसून येते उस्मानाबाद जिल्ह्यातील हे २ नंबरचे कॉलेज असल्याचे लक्षात येते.

महाविद्यालयाची गुणवत्ता -

मराठवाडा विद्यापीठ युवक महोत्सवात "गन्हाण एकांकीला" अभिनयाचे सन १९८६ मध्ये सुवर्णपदक मिळाले. १३ डिसेंबर १९८६ मध्ये घेण्यात आलेल्या " दारूचे दुष्परिणाम, " या विषयावरील दूरदर्शन एकांकी स्पर्धेसाठी केंद्र सरकारचे अभिनयाचे प्रथम पारितोषिक श्री. एस्. एम्. कवठेकर यास मिळाले. विद्यापीठ परीक्षाच्या निकालाची उज्वल परंपरा या महाविद्यालयाने राखली आहे.


महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे क्रीडा क्षेत्रातील नैपुण्य-

या महाविद्यालयातील श्री. वडणे, श्री. नरवडे, श्री. रवि कापसे, या विद्यार्थ्यांनी मराठवाडा विद्यापीठाचे अखील भारतीय आंतर-विद्यापीठीय कुस्ती स्पर्धेमध्ये प्रतिनिधीत्व केले. श्री. रावसाहेब शिंदे, श्री. धनंजय हगरगेकर यानी विद्यापीठ कबड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांक सन १९८५ मध्ये मिळविला. कु. सुवर्णा भाटे ची दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनासाठी सन १९८५ मध्ये निवड झाली.

महाविद्यालयातील उपक्रम -

राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत मंगरूळ, धारुर येथे ग्रामीण पुर्नरचना शिबीरे अयोजित केली होती. त्यामध्ये स्वच्छता मोहिम, वृक्षारोपण, रक्तदान, इत्यादी कार्यक्रमाचे संयोजन केले. बापूजी साळुंखे यांच्या ८ ऑगष्ट या स्मृती दिनी वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली जाते. ग्रंथालयातून पुस्तक पेढी सारख्या योजना चालविल्या जातात. "कमवा व शिका," ही योजना राबविली जाते याचा दरवर्षी चार विद्यार्थ्यांना लाभ मिळतो.

आकृती क्र ४


शिक्षण महर्षि बापूजी साळुंखे महाविद्यालय, कराड. या महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या
वर्षनिहाय आलेख
(कोष्टक क्रमांक ४-२१)
प्रमाण
'क्ष' अक्ष 1 से.मी.= 1
'य' अक्ष 1 से.मी. = ५०
य
११००
१०५०
१०००
९५०
९००
८५०
८००
७५०
७००
६५०
६००
५५०
५००
४५०
४००
३५०
३००
२५०
२००
१५०
१००
५०
विद्यार्थी संख्या.
वर्ष →
८४-८५
८५-८६
८६-८७
८७-८८
क्ष

४] शिक्षण महर्षि बापूजी साळुंखे महाविद्यालय कराड [जि. सातारा]

कराड येथे माध्यमिक विद्यालय व अध्यापक विद्यालय काढल्यानंतर काळाची गरज लक्षात घेवून संस्थेने या ठिकाणी सन १९८४ पासून विना अनुदान तत्वावर हे महाविद्यालय सुरु केले. कला, वाणिज्य या शाखेचे वर्ग संत तुकाराम विद्यालयाच्या इमारतीत चालतात. बापूजींच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी या महाविद्यालयाने "सुसंस्कार" हे त्रैमासिक सुरु केले आहे. श्री. यु. के. देशमुख यानी या महाविद्यालयाचा विकास घडवून आणला. सद्या श्री. आर. ए. कदम प्राचार्य म्हणून काम पाहतात.

या महाविद्यालयाच्या विद्यार्थी संख्येची प्रगती.

कोष्टक क्रमांक ४. २१

| अ. नं. | शैक्षणिक वर्ष | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १. | १९८४-८५ | ३०० |
| २. | १९८५-८६ | ६०० |
| ३. | १९८६-८७ | ८५० |
| ४. | १९८७-८८ | ११०० |

या कोष्टक क्रमांक ४. २१ वरून सन १९८४-८५ मध्ये विद्यार्थी संख्या चागली होती असे दिसते. त्यानंतर दरवर्षी विद्यार्थी संख्या वेगाने वाढत आहे. विद्यार्थी संख्येच्या बाबतीत हे महाविद्यालय प्रगतीपथावर असल्याचे दिसते.

या महाविद्यालयाची गुणवत्ता -

श्री. विजय येवले याने प्रथमवर्षा वाणीज्य या परिक्षेत विद्यापीठात ५ वा क्रमांक मिळविला. या महाविद्यालयाने विद्यापीठ परीक्षेच्या उज्वल यशाची परंपरा कायम टिकविली आहे.

या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे क्रीडा क्षेत्रातील नैपुण्य -


सन १९८४ मध्ये संजय पाटील याने राज्य पातळीवरील कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. सन १९८७ मध्ये श्री.प्रकाश पाटील याने ॲथलेटिक्स स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला. सन १९८५ मध्ये कु. छाया रेणावीकर हिने जिल्हा हिवाळी स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. सन १९८७ मध्ये श्री. आर. ए. रासकर याने ॲथलेटिक्स स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला.

या महाविद्यालयातील उपक्रम -

सन १९८४ मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत साकुर्डी येथे समाजसेवा शिबीर आयोजित केले. सन १९८५ मध्ये आजचे राष्ट्रीय शिक्षण या विषयावर सन १९८५ मध्ये चर्चासत्र घेतले. सन १९८७ मध्ये विद्यार्थ्यांनी विंग, केसे, साजूर या गावांत प्रौढ शिक्षण केंद्रे सुरु केली.

५] समाज भूषण गणपतराव केशवराव काळभोर महाविद्यालय, लोणीकाळभोर - (जि. पुणे.)

बापूजींनी लोणी काळभोर येथे जयहिंद हायस्कूल काढले. तेथील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाची गैरसोय लक्ष्यात घेवून संस्थेने सन १९८४ मध्ये विना अनुदान तत्वावर हे महाविद्यालय सुरु केले. या ठिकाणचे थोर समाजसेवक गणपतराव केशवराव काळभोर यांनी आर्थिक सहकार्य केल्यामुळे त्यांचे नांव या महाविद्यालयास दिले. श्री. आर. ए. कदम हे या महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य होते. अनुदान मिळत नसतानाही या प्राचार्यांनी महाविद्यालयाचा विकास घडविला.



आकृती क्रमांक ५
(कोष्टक क्रमांक ४-22)
प्रमाण
विद्यार्थी संख्या
य
३५०
३००
२५०
२००
१५०
१००
५०
0
वर्ष →
८४-८५
८५-८६
८६-८७
८७-८८
→क्ष

सुरुवातीस कला, वाणिज्य, या शाखेच्या प्रथम वर्षाची विद्यार्थी संख्या १०५ होती. सद्या या महाविद्यालयाचे वर्ग जयहिंद हायस्कूलच्या इमारतीत चालतात. प्रसिध्द अभिनेता राजकपूरने या महाविद्यालयास एक हेक्टर जमीन दिली आहे. सद्या श्री. एस्. एस्. जाधव हे प्राचार्य म्हणून काम पाहतात.

या महाविद्यालयाच्या विद्यार्थी संख्येची प्रगती.

कोष्टक क्र. ४. २२

| अ. नं. | शैक्षणिक वर्ष | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १. | १९८४-८५ | १०५ |
| २. | १९८५-८६ | १५० |
| ३. | १९८६-८७ | २३० |
| ४. | १९८७-८८ | ३५० |

या कोष्टक क्रमांक ४. २२ वरून सन १९८४-८५ मध्ये विद्यार्थी संख्या बरी होती. त्यानंतर दरवर्षी विद्यार्थी संख्या वाढत गेली असे दिसून येते.

या महाविद्यालयाची गुणवत्ता-

सन १९८५ मध्ये प्राचार्य आर. ए. कदम यांची नवीन शैक्षणिक धोरण या समितीसाठी पुणे विद्यापीठ तर्फे निवड झाली. सन १९८५ मध्ये कु. वंदना काळभोर हीस राष्ट्रीय शिष्यवृत्ती मिळाली. सन १९८५ मध्ये श्री. पी. व्ही. जाधव याने पुणे विद्यापीठाच्या प्रथम वर्ष कला परिक्षेत ३ रा क्रमांक मिळविला. सन १९८६ मध्ये श्री. निर्मळ राजन याने चित्रकला स्पर्धेत जिल्हा पातळीवर प्रथम क्रमांक मिळविला.

या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे क्रीडा क्षेत्रातील नैपुण्य -

सन १९८५ मध्ये कु. वंदना काळभोर हीची राष्ट्रीय कबड्डी सामन्यासाठी हरियाना येथे निवड झाली. सन १९८६ मध्ये श्री. सुरेश रोकडे यांची राज्यपातळीवरील खो-खो स्पर्धेसाठी निवड झाली.

या महाविद्यालयातील उपक्रम -

राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत विझंर या गांवी ग्रामीण पुर्नरचना शिबीर घेतले. तसेच या महाविद्यालयात वृक्षारोपण, रक्षाबंधन, वक्तृत्व स्पर्धा हे उपक्रम घेतले जातात.

ड] बापूजी साळुंखे यांनी स्थापन केलेली कांही अध्यापक विद्यालये व अध्यापक-महाविद्यालये.

वाढत्या शिक्षण प्रसारा बरोबर, प्रशिक्षीत अध्यापकाची गरज भासू लागली हे ओळखून बापूजीनी कांही अध्यापक विद्यालये व महाविद्यालये काढली. या प्रशिक्षण विद्यालय व महाविद्यालयाची प्रगती जाणून घेण्यासाठी, अभ्यासकाने कांही अध्यापक विद्यालये व महाविद्यालयेना भेटी दिल्या. बापूजीनी शिक्षकांच्या प्रशिक्षणाची सोय व्हावी म्हणून एकंदर ८ अध्यापक विद्यालये व ३ अध्यापक महाविद्यालये काढली. [बापूजीनी स्थापन केलेल्या अध्यापक विद्यालये व महाविद्यालये यांची यादी परिशिष्ट क्रमांक ६ मध्ये दिली आहे.] अभ्यासकाने त्यापैकी सातारा, उस्मानाबाद, सांगली या जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करणा-या एकेका अध्यापक विद्यालय व महाविद्यालयांना भेट देवून मिळवलेली माहिती पुढील प्रमाणे दिली आहे.

[क] अध्यापक विद्यालये -

१] कमला नेहरु ज्यु कॉलेज ऑफ एज्युकेशन कराड - [जि. सातारा]

स्त्रीयांच्या प्रशिक्षणाची सोय व्हावी म्हणून कमला नेहरु अध्यापिका विद्यालय सन १९५५ मध्ये सुरु केले. बंडो गोपाळ मुकादम यांनी हे अध्यापक विद्यालय चालविण्यास खूप मदत केली. श्री. शांताराम काकडे हे या विद्यालयाचे पहिले प्राचार्य होते. सुरवातीस ७८ विद्यार्थीनींची संख्या होती. सध्या १६० विद्यार्थीनींची संख्या झाली आहे. सध्या येथे श्री. जी. एल. ऐनापुरे हे प्राचार्य म्हणून काम पाहतात. शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद सातारा यांचे कडून दरवर्षी गुणवत्ता यादी येते व त्यानुसारच प्रवेश दिला जातो. प्रवेशासाठी देणगी घेतली जात नाही.

येथे स्त्री मुक्ती स्थापना केली आहे. तसेच चर्चा सभासाठी कमला नेहरु स्मारक मंदिर आहे.

या अध्यापक विद्यालयाची गुणवत्ता -

या अध्यापक विद्यालयातील दर वर्षी सरासरी पाच विद्यार्थीनी शासकीय परीक्षा मंडळाच्या गुणवत्ता यादीमध्ये येतात. डी.एड्. परीक्षांच्या उज्वल यशाची परंपरा या विद्यालयाने टिकविली आहे. दरवर्षी शेकडा १०० निकाल लागतो.

अध्यापक विद्यालयातील उपक्रम -

निरनिराळ्या विषयावर चर्चासत्रे आयोजित केली जातात. या विद्यालयातर्फे दरवर्षी ग्रामीण भागात समाज सेवा शिबीरे घेतली जातात. त्यात विद्यार्थीनी खालील कार्यक्रमाचे आयोजन करतात. सामुहिक स्वच्छता सप्ताहामध्ये शाळा क्रिडांगण व त्या गावातील मंदिराची स्वच्छता केली जाते. सहभोजन रक्षाबंधन उपक्रम करतात. लोकरंजनातून लोकशिक्षण- पोवाडे, गाणी, नकला यांच्या द्वारे लोकशिक्षण देतात. मुलीसाठी शिवणकाम, घरसजावट व निरनिराळ्या वस्तू तयार करण्याचे मार्गदर्शन केले जाते. या ट्रेनिंग कॉलेजातील प्राध्यापिका अध्यापना-शिवाय समाजसेवेचे ही काम करतात. उदा. कुटुंब नियोजनाचे महत्व पटवून देणे, बालसंगोपन, बागकाम.

२] तुळजाभवानी अध्यापक विद्यालय, तुळजापूर [जि.उस्मानाबाद]

श्री.साहेबराव हंगरगेकर यांच्या सहकार्याने सन १९५९ मध्ये हे अध्यापक विद्यालय सुरु केले. श्री.रा.ना.मराठे हे या अध्यापक विद्यालयाचे पहिले प्राचार्य होते. या ठिकाणी प्रशिक्षणार्थीची एकूण संख्या ९२ आहे.

शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद यांचेकडून दरवर्षी गुणवत्ता यादी येते व त्यानुसारच प्रवेश दिला जातो. प्रवेशासाठी देणगी घेतली जात नाही. दरवर्षी या ठिकाणी ३ महिन्याचे सेवान्तर्गत प्रशिक्षणाचे वर्ग चालतात. त्यासाठी ५६ प्रशिक्षणार्थींची निवड जिल्हा परिषदेकडून केली जाते. राष्ट्रीय शिक्षण प्रशिक्षण आणि संशोधन मंडळाकडून सन १९८४ मध्ये एका स्वतंत्र प्रयोग शाळेस मान्यता मिळाली आहे. तसेच येथील प्रौढशिक्षण विभागाकडून सन १९८५ मध्ये कांक्रंबा येथे स्वयं अध्ययन केंद्र सुरू केले.

## या अध्यापक विद्यालयाची गुणवत्ता -

या अध्यापक विद्यालयातील प्रशिक्षणार्थींची गुणवत्ता निरनिराळ्या प्रकल्पाद्वारे वाढविली जाते. येथील सरासरी दहा विद्यार्थी शासकीय परीक्षा मंडळाच्या गुणवत्ता यादीमध्ये येतात. येथील दरवर्षी शेकडा ९५ निकाल लागतो.

## या अध्यापक विद्यालयातील उपक्रम -

येथे निरनिराळ्या विषयावर चर्चासत्रे आयोजित केली जातात. तसेच दरवर्षी ग्रामीण पुर्नरचना शिबीरे घेतली जातात. येथे उद्बोधन वर्ग आयोजित करतात. सन १९८७ मध्ये मंगरूळ येथे समाजसेवा शिबीर घेतले होते. शिबीर कालावधीत सामुहिक स्वच्छता सप्ताह, वृक्षारोपण सहभोजन इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

## [ख] अध्यापक महाविद्यालये.

### १] शिक्षण महाविद्यालय उस्मानाबाद

मराठवाड्यात उस्मानाबाद जिल्हा शैक्षणिक दृष्टया मागासलेला असल्याने प्रशिक्षित शिक्षकांची या भागात कमतरता होती. त्यामुळे बापूजींनी शिक्षकांच्या प्रशिक्षणाची सोय व्हावी म्हणून सन १९६० मध्ये हे

महाविद्यालय सुरु केले. पूर्वीच्या हैद्राबाद राज्याचे शिक्षण संचालक डॉ. शेंदारकर हे पहिले प्राचार्य लाभले. त्यानंतर श्री. एम. डी. राणे हे प्राचार्य झाले. सद्या श्रीमती डॉ. यू. एच्. खानापूरकर या महाविद्यालयाच्या प्राचार्या म्हणून काम पाहतात. डी. एड्. आणि बी. एड्. चे वर्ग या महाविद्यालयात एकाच इमारतीत चालतात. हे कंपोजिट कॉलेज म्हणून ओळखले जाते. दर वर्षी बी. एड्. साठी ८० विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. त्यामध्ये उस्मानाबाद जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाते. डी. एड्. प्रवेशाची ८० विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी दरवर्षी शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून येते. व गुणवत्तेनुसारच प्रवेश दिला जातो. त्यासाठी देणगी घेतली जात नाही. कांही गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना येथील वसतिगृहात प्रवेश दिला जातो.

## महाविद्यालयाची गुणवत्ता -

बी. एड्. परीक्षेमध्ये दरवर्षी या महाविद्यालयाचे दहा विद्यार्थी गुणवत्ता यादीमध्ये असतात. सौ. शालन देशमुख यांना सन १९८७ मध्ये एम्. एड्. परिक्षेत विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळाला. बी. एड्. व एम्. एड्. या परिक्षांच्या उज्वल यशाची परंपरा या महाविद्यालयाने टिकविली आहे.

## महाविद्यालयातील उपक्रम -

या महाविद्यालयात निरनिराळ्या विषयावर चर्चासत्रे आयोजित केली जातात. दरवर्षी ग्रामीण भागात समाजसेवा शिबीरे घेतली जातात. सन ८६-८७ मध्ये राघूचीवाडी येथे समाजसेवा शिबीर आयोजित केले होते. शिबीर कालावधीत विद्यार्थ्यांनी खालील कार्यक्रम पार पाडले.

१] शेतक-यात जागृती होण्यासाठी बी-बियाणे, खते कर्ज पुरवठा या बाबत माहिती दिली. २] सामाजिक एकता वाढविण्यासाठी सामुहिक

स्वच्छता सप्ताह पाळून शाळेची क्रिडांगणे, मंदिरे, यांची स्वच्छता केली. सहभोजन, रक्षाबंधन, रक्तदान यासारखे उपक्रम केले. ३] लोकरंजनातून लोकशिक्षण- पोवाडे, गाणी, नकलाद्वारे लोकशिक्षण दिले उदा. दारुड्याच्या नकलेतून दारुचे दुष्परिणाम पटवून दिले.

२] कन्या अध्यापक महाविद्यालय - तासगांव [जि. सांगली]

बापूजी साळुंखे यांनी माध्य. विद्यालय , अध्यापक विद्यालय, कला वाणिज्य महाविद्यालय, येथे सुरु केल्यानंतर या जिल्हयात स्त्री शिक्षीकांची गरज निर्माण झाल्यामुळे या कन्या अध्यापक महाविद्यालयाची स्थापना सन १९८४ मध्ये केली. या महाविद्यालयास अनुदान मिळत नाही. दर वर्षी ८० विद्यार्थीनीना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. त्यामध्ये सांगली जिल्हयातील विद्यार्थीनींना प्राधान्य दिले जाते. सद्या श्री. बी.डी. ससे प्राचार्य म्हणून काम पाहतात. महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

या अध्यापक महाविद्यालयाची गुणवत्ता -

कु. राजश्री मंहिद हिची राज्य पातळीवरील खो-खो स्पर्धेसाठी सन १९८६ मध्ये निवड झाली. बी.एड्. परीक्षेमध्ये दरवर्षी या महाविद्यालयाच्या दोन विद्यार्थीनी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीमध्ये असतात.


या अध्यापक महाविद्यालयातील उपक्रम -

निरनिराळ्या विषयावर चर्चासत्रे घेतली जातात. कार्यानुभव विषयावर भर दिला जातो. सन १९८६ मध्ये चिंचणी येथे समाजसेवा शिबीर आयोजित केले होते. शिबीर कालावधीत खालील कार्यक्रम पार पाडले.

१] शेतक-यात जागृती होण्यासाठी बी.बीयाणे खते कर्ज पुरवठा या बाबतची माहिती दिली.
२] लोकरंजनातून लोकशिक्षण पोवाडे, गाणी, नकलाद्वारे लोकशिक्षण दिले.

आकृती क्रमांक ६

श्री स्वामी विवेकानंद संस्थेच्या शाखांची संख्यात्मक वाढ दर्शविणारा आलेख.



श्री स्वामी विवेकानंद संस्थेच्या विविध शाखा जून १९५५ पासून सुरु झाल्या. या शाखांची वाढ कशी होत गेली हे खालील कोष्टकात दाखविले आहे.

श्री स्वामी विवेकानंद संस्थेच्या शाखांची संख्यात्मक वाढ

कोष्टक क्रमांक ४.२३

| अ.नं. | वर्ष | शाखांची वाढ | एकूण |
|---|---|---|---|
| १. | १९५५-१९५६ | ५ | ५ |
| २. | १९५७-१९५८ | २५ | ३० |
| ३. | १९५९-१९६० | ६५ | ९५ |
| ४. | १९६१-१९६२ | ४५ | १४० |
| ५. | १९६३-१९६४ | १० | १५० |
| ६. | १९६५-१९६६ | १५ | १६५ |
| ७. | १९६७-१९६८ | २० | १८५ |
| ८. | १९६९-१९७० | १० | १९५ |
| ९. | १९७१-१९७२ | १ | १९६ |
| १०. | १९७३-१९७४ | ४ | २०० |
| ११. | १९७५-१९७६ | २५ | २२५ |
| १२. | १९७७-१९७८ | - | २२५ |
| १३. | १९७९-१९८० | - | २२५ |
| १४. | १९८१-१९८२ | - | २२५ |
| १५. | १९८३-१९८४ | ३० | २५५ |
| १६. | १९८५-१९८६ | ५ | २५९ |

५ समारोप-

या प्रकरणामध्ये प्रश्नावलीद्वारे, मुलाखतीद्वारे व भेटीद्वारे मिळविलेल्या माहितीचे पृथक्करण व अर्थनिर्वचन केले आहे. या माहितीच्या आधारे पुढील प्रकरण क्र. ५ मध्ये बापूजींचे शैक्षणिक तत्वज्ञान दिले आहे.